
पयला वहरी तिहरो अंक

'नाताळ' २५ डिसेंबर २०१२

# कादोडी



"सगळयांना नाताळश्यो आन नवीन वहरायो ओबडयो शुभेच्छा"

# कादोडी

**नाताळसो हण विशेषांक**

२५ डिसेंबर २०१२

पयला वहरी तिहरो अंक

खाजगी वितरण

स्वागत मूल्य – ऐच्छिक

**या अंकात .......**


संपादकीय

बाळटीम – जोसेफ तुस्कानो

हॅलो में प्रिंस बॉलातें. - सिरील मिनेजीस

ओलांडा - एक काळ रात्र – सचिन मेंडिस

दादीई श्रद्धा - रॉबर्ट फर्नांडिस

येदयात गा ते दि परत - एडवर्ड डिसोझा

फोन आल्ये - एलायस परेरा

तरी ती माईस पोरी - राजन डिमेलो

कुपारी खाना – तेरेजा डिसोजा

आपलो बाबुकाका - जोएल गोन्सालवीस

प्रतिक्रिया - बर्नर्ड लोपीस

बाबुकाका आणि ती – सचिन रॉड्रिग्ज

वरांगळो - फ्रान्सिस डिमेलो


**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान किंवा आपलो या अंकाविषयी अभिप्राय, तुमाला का आवडला, का नाय ता आमाला जरूर कळवा. बाजूश्या ई-मेल आयडी वर ई-मेल करा किंवा संपादक मंडळाश्या कुणालाही फोन करा


**संपादक**

ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**संपादक मंडळ**

सायमन रॉड्रिग्ज – ९९२०६२३५७५

सुनील डिमेलो -९७६७०१५२९७

एडवर्ड डिसोझा ९००४०३७९५० -

डॅनियल मस्करणीस – ९१५८९८६०२२

राजन डिमेलो – ८९८३४०९९८५

जेम्सन डिमेलो – ९८७०१४८३३९

रॉबर्ट फर्नांडिस – ९२२३५९५८३६

रॉबिन्सन डिमेलो ९०११२२६२६९ -

वॉल्टर तुस्कानो – ९७३०२७०३०२

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :-** www.onevasai.com



**मुद्रक :-** मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व – ९७६४८७४४९३


**सूचना:-** कादोडी या अंकाव चौथो अंक ईस्टरश्या हणादिहा, ३१ मार्चला प्रकाशित होणार. या अंकात तुम्हाला लेख कविता आहा कय साहित्य द्यासा हायदे ते १ मार्चपर्यन्त **kadodivasai@gmail.com** मेल करा किंवा संपादक मंडळाला संपर्क करा.

सगळे जाहिरातदार, देणगीदार तहेस चांगल्यो सूचना-अभिप्राय देणाऱ्या सगळ्या कादोडी बंधु-भगिनींशे आम्ही खूप आभारी हाव.
**नाताळसो हण सगळ्या वाचकांना खुब आनंदाव आन मजेसो जाव अह्यो शुभेच्छा**

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदेस आहा नाय.**

# संपादकीय

सगळ्या कुपारी भाआ-बेनी, दादय-बाबा, काका-काकय, मामा-माई, मावशी-मावसो, बाय-फुया, मदरीन-पदरीन, भोटो बाबा-बय आन बारके टाराक-टुरुक बच्चे कंपनी, नाताळश्या हणायो खुब खुब शुभेच्छा, आपलो एकटोशे एकटो हौशेसो हण मनजे "नाताळसो हण" आन या हणाला आणखीन मज्जा हाडयादो पहिल्यांदास आमे "कादोडी" अंक घेवोन आल्यात. परत एकदा वेगवेगळ्या लेखकायी धाडलेल्या मस्त मस्त लेख-कविता रूपी मोगरो-काकड्याने यो अंक घमघमले. मागशे दोन अंक तुमे एकदम आवडीने वाशिले आन त्यावर ज्यो भारीस भारी प्रतिक्रिया दिल्यो, आमसा मन पोट भरला, फोन, मेल याव नुसतो पानी पडलो.

या अंकाकरता खुब जनाये लेख वैगरे आल्यात पण जागा जास्ती नहल्यामुळे सगळेस देता येत नाय एका वेळेला, ज्यांशे नाय आले त्यायी वाईट वाटोण घेव नाका, आपली भाषा टिकवोन थव्या करता आण आपल्या भाषेत साहित्य निर्मिती करण्यात तुमे आमशे सहप्रवासी हात किंवा वाटेकरी हात त्यामुळे पुढश्या अंकात नाकीस तुमसो लेख-कविता येदे यायी खात्री बाळगा

बाकी आमे जो यो उपक्रम घेतले त्याला तुमसो अहोस पाठींबो देत ऱ्या, आमाला यो अंक तुमश्या पर्यंत फुकट पोषव्यासो होतो पण ता शक्य होव नाय, प्रसंगी आमे पदरशे पैशे पण घायले त्यामुळे यो अंक वाशिल्योर तुमाला जा कय वाटेदे द्यादो ता तुमे आमश्या पर्यंत पोसवा.

परत एकदा तुमश्या सगळ्यांना नाताळश्या हणायो शुभेच्छा **ख्रिस्तोफर रिबेलो, सोकाळा**

---

# लग्नाला पारंपारिक पोशाख

प्रिय मित्रमैत्रिणींनो, आपली कुपारी संस्कृती टिकवोन ठव्या करता खुपशे प्रयत्न सलल्यात, आपल्या बोलीभाषेमिन्सो पयलो अंक "कादोडी"," बारा आणे बाटली जाम काम" आन "हाऊ ओउसा तळा"ये नाटक आन सगळ्या कुपाऱ्यांना एकाच जागी हाडणारो "कुपारी संस्कृती महोत्सव". विशेष मनजे यी सगळा या एका वहरात, खुब भोटी मजल आपुन कुपाऱ्यायी मारले आन यास संस्कृती संवर्धन मुद्याला धरोन आज माला एक नवीन विसार आपल्या पुढे मांडयासो हाय.

आपल्या धर्मात सात साक्रामेन्त हात, या मिनसा सगळ्यात जास्ती ज्या साक्रामेंताला वलय हाय तो मनजे "लग्न" साक्रामेन्त, जो साक्रामेन्त आपल्या भारत हारक्या सेकुल्यर देशात बहुतेक करोन हारकोस साजरो केलो जाते वेज आन ड्रिंक्ससा -आते आपल्या आडे नॉन) प्रमाण जास्ती आहातेयी गोष्ट वेगळीपण तुमे एक गोष्ट काते लक्षात घेतले गा (?, बाकी सगळ्या धर्मात किंवा समाजात लग्न लाव्याश्या वेळेला त्या त्या समाजासो पारंपारीक पोशाख नवराफक्त आपुन वसईकर होडले ते बाकी समाज मनजे मल्याळी .नवरीने घायलेलो आहाते- नवरी -मारवाडी आन मुस्लिम या सगल्यानशे नवरा-गुजराती-पंजाबी-साडी तहेस पारशी व्हाइट कलरशी लुंगी आन त्यास कलरशी-लोकांशी ऑफ लगीन लागताना त्यानश्या पारंपरिक पोषाखात आहात्यात फक्त रिसेप्शनला ते सूटशालू अहया ड्रेसमिने आहात्यात-, आपल्या अडे नवरो आयतवारे हाकोटपासून ते होमवारे हान्सो हारोडी सौदीयाला जा पर्यंत फक्त सुटातुस आहाते )आते कायिक जन शेरवानी घालत्यात पण तो काय आपलो पारंपारिक पोशाख नाय (आन नवरी पन आयतवारे हानश्या पारा नावळी वेळेपासून ते दुहऱ्या दिहा मायारा जा पर्यंत शालूमिनेस आहाते.

माला आहा वाटाते की जर इतर समाजाशे लोक जर त्यानसो पारंपारिक पोशाख लग्नाला जर वापरत्यात हायदे ते आपुन कुपारी कय नाय ताहा बगीला ते .आपल्या देवळात लगीन लावताना आपलो पोशाख मनजे नवऱ्याला तांबडी टोपी, खमिस-कब्जा आन पोन्या आन नवरीला लाल लुगडा आन सोळी घालोन जाना सोयिस्कर नाय कारण आपली लगीन लाव्याशी पद्धत वेस्टर्न स्टाइलशी हाय तडे माला वाटाते सूट & गाऊन अहलो पाय पण नावळ हाडया जाताना किंवा रिसेप्शनला आपलो यो पोशाख घाल्या कय हरकत नाय, दुहऱ्या दिहा मनजे सौदीयाश्या दिहा नवरीने एक चांगली साडी घालना बरा भले आपल्या दरी खुब पैशे हायद्यात तरी पण शालू संस्कृती आपुन बंद कऱ्या पाय. आत्याश्या काळात आपली वेशभूषा आपल्या जुन्या माहनाबरोबर नाश होव्याश्या मारगोर हाय कय काळानंतर यो पोशाख आपल्या नंदऱ्या पद्य नाय भगून मे हांगाते की आपुन आपल्या लग्नात तरी यो पेहराव टिकवोन ठव्यासो एक छोटोसो प्रयत्न करोन बगोया. याकरता आपल्यास समाजामिने ओडे टेलर वैगरे हात त्यांना नवीन बिझनेसशी एक संधी पण हाय. लाल लुगडा-सोळी किंवा पोन्या-खमिस-कब्जा-टोपी आपल्यास मिनश्या कुणे तरी तयार कऱ्याशी किंवा ती पुरव्याशी एजन्सी घेतली तर आपलो पोशाख आन तो पण आपुनुस बनव्याशी कला आपल्या आडे आत्याश्या मॉडर्न जमान्यात आपल्याला साधता येदे. .

बघा विसार करा, जर शक्य हायदे ते यी प्रथा सुरू करो सला......... ख्रिस्तोफर रिबेलो, सोकाळा

## नम्रता टूर्स आणि कॅटरर्स

**आयोजित**



**१) गोवा मालवण सहल: दि. २६ डिसें. ते ३० डिसें २०१२ -**
सहल खर्च प्रौढ: रु.५०००/मुले: रु. ४०००

**२) नवसाला पावणाऱ्या बाळ येशूचे दर्शन, नाशिक: दि.०९ ते १० फेब्रु.२०१३**
वाईन Factory, मुक्तिधाम, पाडवलेणी,साखर कारखाना व इतर
सहल खर्च प्रौढ: रु.२०००/मुले: रु. १६००

**३) खास शिक्षक, विद्यार्थी व इतरांसाठी आयोजित मराठी भाषेत मद्रास वेलंकनी मातेचा नोव्हेना दि. ०६ मे ते १५ मे २०१३**
सहल खर्च प्रौढ: रु.७५००/मुले: रु. ५०००,
A.C. रूम व A.C. प्रवास रु.१२५००
निराशा टाळण्यासाठी १२० दिवस अगोदर म्हणजे दि.०५ जाने.२०१३ पर्यंत आपली नावे नोंदवून सीट बुक करा.

**४) निसर्गरम्य पाचगणी - महाबळेश्वर - प्रतापगड सहल दि .१९ मे ते २१ मे २०१३**
सहल खर्च प्रौढ: रु.५०००/मुले: रु. ४०००

**खास वैशिष्ठ्ये**

* सहल क्रमांक १,२ व ४ मध्ये संपूर्ण प्रवास २ x २ लक्झरी बसने असेल.
* हॉटेल वास्तव्य: ४ जणास एक रूम (Family रूम)
* भरघोस नाश्ता, चहापाणी, घरगुती शाकाहारी व मांसाहारी जेवण
* प्रत्येक सहलीस स्नेहमेळावा (गेट - टूगेदर)

**मर्यादित जागा, सुयोग्य नियोजन, शांत - सुस्वभावी व सर्वांना आपलंसं करून घेणारं व्यवस्थापन**

***संपर्क***
मायकल डि'मेलो (वटार): ९८५०१७२३९५
विलास घोन्सालवीस (गास):९८२३२१२५२७
जेरोम रॉड्रिग्ज (पेडी): ३०५२३००५, ९७३०२७२८३१
इनास विलास घोन्सालवीस (उमराळे): ९३२३९१८६४३
आवेलीना(आयडू) डाबरे (भुईगाव): ९८२३५२१००९, ९६७३६३३६१६
पास्कोल परेरा (घोसाळी) :८१४९६६४५२४
सायमन डी'ब्रिटो (चिंचोडी) :९८५०६३८२१२
सालोमन तुस्कानो (गास): ९१५८०३५३९४

## श्री. एलायस रिबेलो आणि सौ. रेजिना रिबेलो

प्रिय मम्मे आन पप्पा...!

आज ह्या क्षणाला आमाला तुमसॉ खुप खुप अभिमान वाटातॅ.

आमश्या करता तूमे खुप त्याग कॅलॉ, आमाला चांगल्या संस्कारात वाडविला आणि

सर्गी-मार्गी लाविला त्या बद्दल आमे तुमशे खुप खुप आभार मानत्याव,

ताहास तुमे लग्नाये २५ वहरे पूर्ण कॅल्या बद्दल तुमसा अगदी मनापासुन अभिनंदन

करत्याव आणि तुमशे पूडशे वहरे आनंदी आन सुखी-समाधानी जावो अही

पराथना त्या मावली सायबेनी दरी करत्याव......!

**तुमशे लेकरे.....**

**रीनल रीबेलो आन रूबन रीबेलो,**

**कॅंदार, नंदाखाल...!**

# बाळटिम

मंडळी ई एक खूप जुनी कानी हाय. तुमाला मायती हाय ना आज काल फिल्यात घ्यादो कुन तयार नॉतें. ती पैरणी घाल्याशी, फिल्यातश्या कॉमसाराला हजेरी लाव्याशी, कॉपात कडें वाटयात बॅठलॉ तें त्याला घॅऑन बार मिनें ब्याहासा , आतें बारसा खटला ताहा बायार-बायारसासु, पण फिल्यातश्या वराडाला हॉन्याई अंगठी गाल्हयाशी. (आतें हॉना कॉडा माग जालें). पण पॉरांदो आमश्या वॅळॅला गोष्ट वेगळी होती, बगा. बुघुनुस में तुमाला ई कानी हांग्या घॅतलें. तिगाळा काहा, कुमारी-कुपरि ऑहया बॉलावणा यासा तॉ एक बॉठ्ठॉ मान हॉतॉ. बाळटिम जाला गा जॉरात कॉपातश्या कॉपात सल्यासा.

तिनेक वहरे जाले या गोष्टीला, एका आयत्वारें इना लुद्रिकश्या नातवाआ बाळटिम जालता. त्यानें अन्द्र्याशेटश्या पावलुला पदरीन घेतलोता. पावलुनें फिल्यातला पन्नास रुपये पैरणि घायलोती आन हॉपारश्या बाजारात वांगे वीकयादो आलॅल्या ईना लुद्रिकश्या बेनीनें ती बातमीस बाजारात विकीलती.

तडें रस्त्याआ दोन बाजूनें बाजार ब-ह्यासॉ. दुमिनें डोख्योरसा टोपला उतरविला, हुंबळ झटकीली, तोंडोरसॉ घाम पूहीलॉ, भय्याला दम दीलॉ, पाटी को दस रुपये देता है तो देव, नहीं तो जाव. मग ती बाजूश्या कतीला हांग्या लागली, आयकीलागा कते, पावलु कुपारीनें गनी पॉराआ बाळटिमाला खॅप्पॅन दा-दा रूपाश्यो पास नोटी घाल्याश्योआ. का बॉलाता?" कतीला नवाल वाटला. त्या वॅळॅला पन्नास रुपये  मींजें भारिस. "आन कुमारी कुन घेतलोतिला?" कतीनें वीसारला ! पण कतीआ प्रश्नाला दुमीनें कय उत्तरूस दिला नाय आन ती दुहु-या व्यापा-या हरी वांग्याऑ भाव ठरव्यादो लागली.

फरशा कामोरनें घारा आलॉ तिगाळा जाम घामाघुम जालतॉ. वालिवला एका फॅक्टरी मिनें तॉ कामाला हॉतॉ. खारभाटनें तॉ रोज पावने स शी बस पकडॉन नाळा हॉपारश्या स्टेशनोर जासॉ. तडनें गाडी पकडॉन दादरला नी मग सेंट्रलशी गाडी पकडॉन तॉ ठाण्याला पॉश्यासॉ. हांश्यापारसॉ पुना तॉस परवास करॉन घारा यासॉ. बिशारॉ जाम वैताग्यासॉ, थक्यासॉ. पण करतें का? बय-पायतू, बायकु, पोरे, लाने बाहा-बेनी ऑडया बॉठ्ठ्या संसाराऑ खुरुस त्या खंदयोर हॉतॉ ना. पायतूआ वाटयाला आल्याले खासरे होते त्या मिनें पहाळयात भाजीपालॉ ऑह्यासॉ तॉडॉस. जेम तेम रगडा सल्लोता तॉस घारात लानी पोरी पान आली.

ती एक मयन्याई जालती आन तीआ बाळटीमाऑ विसार साललॉतॉ. एक दी दॉपारशी फरश्याई बोठी हाळी, तीआ बेनीला बॅठया आलती. हळव्याई पेटी उहिखाला लोटीता-लोटिता तिनें बाळटीमाई चौकशी केली. पोरीआ बाळटिमाला मादरीन-पदरीन ठरविल्यात गा"?

नाय क? फरशाआ बायकुनें बेनीला विसारला. मग तीआ बॉठया बायनें तिला हॉपारश्या बाजारात आयकीलती ती वार्ता हांगिली. आला, बाळटीमाला पन्नास रूपाशी पैरणी मींजें कय खासा काम हाया? तिनें बेनीला अन्द्र्याशेटश्या पावलुलास पदरीन घ्यासा सुशविला. पावलु, शेटश्या घरसॉ हाय. पोरीआ लग्नाला हॉन्याई हाकळी येदें ई तिनें बेनिला पटवॉन दिला. तिला पन पटला. हांसॉ फरशा येता बरोबर त्याला तिनें अन्द्र्याशेटश्या घारा धाडला, पावलुला कुपारी घ्यादो, आवताण द्यादो.

थकलॉ-भागलॉ फरशा पावलुआ घारा पॉसलॉ. तॉ हेतोरनें आलतॉ बास. पावलुनें त्याऑ हेतु हेरलोतॉ. त्यानें फरशाला बंगल्योरशा खोलीत नीला. कबाडातनें नवटाकशी बाठली काडली आन शाऊन बार काडला. में घे नाय फरशानें त्याला नम्रपणे हांगीला. आयला, तुमशी पान कमाल हाया आहा बॉलॉन त्यानें फरशा करता लेमन मागवीलॉ. लेमनसा ग्लास तॉन्डाला लविता लाविता फरशानें पावलूआ पुडें कुपारीआ प्रपोजल मांडीला. "पान कुमारी कुन घ्याशी?" पावलु.

ता कय अजून ठरला नाय. फरशा बोयलॉ.

मग कॉपात आहा करा ना; नानीबायश्या बेबिलास कुमारी घ्या पावलूनें आग्रह धरलॉ. बगॉ या आहा बॉलात फरशा पावलुआ बंगल्योरनें उतारलॉ. त्याला पावलुआ बेडर वृत्तिई किळस वाटली आन कुमारीआ बाबतीत त्याऑ आग्रह नाय आवडलॉ.

## जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / 429/88-89 दिनांक 9-12-1988

| आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा |
|---|

***१२ महिन्यापेक्षा जास्त ते ३७ महिन्यापर्यंत***

**जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर**

द.सा.द.शे. ९.८५ % व्याजदर

**सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ९.६० % व्याजदर**

९% ते १४ % व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

**३०सप्टेंबर २०१२ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

* **भागभांडवल रू. ४.७८ कोटी**
* **कर्जे रू. ५४.४४ कोटी**
* **ठेवी रू. ८३.९४ कोटी**
* **गुंतवणूक रू. ३७.०४ कोटी**
* **सभासद संख्या ८६७६**
* **दि. ३१/०३/१२ अखेर ढोबळ नफा रू. २.१८ कोटी**

विश्वासाचे व सौजन्यपूर्ण सेवेचे प्रतिक म्हणजे

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी

**- शाखा -**

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट |
|---|---|---|---|
| फोन :२४७०५५२/५५३ | फोन : २५८५१७० | फोन : २४११०१२ | फोन :२५५१५५१ |

| | | |
|---|---|---|
| ग्रेगरी एम. दोडती | रॉक जी. रॉड्रीग्ज | सिल्वेस्टर ए. दोडती |
| चीफ मॅनेजर | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

व

- संचालक मंडळ -

पण फरश्याई बायकु आयक्यादो तयारूस नोती. बुघुन परत तॉ नानीबायश्या ओटयोर सडलॉ. बेबीनॅं मात्र कुमारी ऑह्यासा साफ सुफ नाकारला. तिला तॉ मागसॉ परसंग आठवालॉ. दादयसा मन मॉडयासा नाय म्हणून ती इनालुद्रिकश्या घारा कुमारी ऑह्यादो गेलती. ईना लुद्रिक सॉ पॉर पेद्रु आन आन्द्र्या शेटसॉ पावलु या दोगाआ मैतर. पावलुई बेबीओर लाइन होती, पान बेबीला तॉ मवाली अजिबात पसंत नॉतॉ. त्या दोन मित्राए एक कट कॅलॉ. पेद्रुनॅं नानिबायश्या दरी वट लाविली आन ती पोरी बेबीला कुमारी गॅथला. पावलु पदरीन हॉतॉस, आन त्यानॅं त्या करिक्रमात जे एकेक परकार केले ते बगॉन बेबी जाम वैतागलोती.

पोरीला देवळात नेताना कुमारी-कुपारीआ स्पेशल जिवान जाला तिगाळा पावलु का का वात्रट बॉयलोतॉ. तिला खूप टॉमणॅं मारतोतॉ. पण बेबीनॅं मात्र त्याला अजिबात दाद लावॉन दिली नाय. जीवने सालू आसताना पावलूनॅं जाम दारु पिलती आन तॉ वाट्टेल ता बरळातोतॉ. बेबीला तर त्याई जाम किळस आलती. जीवान जाला तिगाळा बेबी पोरीला खेळवित खोलीत बेहेलती तिगाळा टाईट जाल्यालॉ पावलु,  का कुमारी करीत तडॅ आलॉ. बेबीनॅं पोरीला तडॅस ठोविला आन पळ काडलॉ. बेबीओर वट मा-या त्यानॅं १०-१० श्यो पास नोटी फील्यातला अयर घायलॉ. कतॅं एकदा ई सगळा आटपातॅं? आहा बेबीला जालता.

फरशाआ पोरीआ बाळटिम ठरल्या हारका जाला. कुपारी पावलुस हॉतॉ पान कुमारी मात्र दुहुरीस कुन तरी होती. पावलु जाम वैतागलोतॉ, शीडलॉ, सरफडलॉ, बी का क-यासॉ. दुहु-या दिहा फरशाई हाळी बाजारात आपल्या मैत्रनीला हांगातोती, आला मा बेनीनॅं पोरीआ बाळटीमाला मदरीन-पदरीन ला जीवान घाल्यादो २५ रूपासॉ कॉम्बडॉ कापीलॉ, पान पावलु कॉपातसॉ अयर का हायदॅं? अवगॅ दा रूपय घाल्याशॅआला यानॅं...!

---

**जोसेफ तुस्कानो, गास**



# त्रैमासिक स्मृती



**ख्रि. जॉना अंतोन रॉड्रिग्ज**

**आटोळी – नानभाट**

**जन्म :- ११ फेब्रुवारी १९३५ मृत्यू :- २६ सप्टेंबर २०१२**

**मत्तय १-५ :०-११** :- नीतिमत्वाकरिता ज्यांचा छळ झाला आहे ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे माझ्यामुळे जेव्हा लोक तुमची निंदा व छळ करितील आणि तुमच्याविरुद्ध सर्व प्रकारचे वाईट लबाडीने बोलतील तेव्हा तुम्ही धन्य आनंद.. करा , उल्हास करा ,कारण स्वर्गातील तुमचे प्रतिफळ मोठे आहे

**देणार :- पती आणि सगळे नातवंडे**

# हॅलो मॅ प्रिंस बॉलातॅ.

इंग्लंडसॉ राजॉ, प्रिंस चार्ल्स, मुंबयश्या डब्यावाळयांना बॅठयादो मुंबयला आलतॉ, त्या टायमाई ई कानी हाय.

डब्यावाळे तुमश्या लक्षात आल्या हायद्यात डबॅ घॅऑन रेल्वेआ लायनीओर .खोडब्यावाळे नाय खो खॅळात भॅआत्यात ते-हा! ये डबयावाळे ऑफिसश्या लोकांना गराम त्याना बॅठयादो प्रिंस आलतॉ ता तूमे .गराम जिव्याश्ये डबॅ पोशवित्यात ते डब्यावाळे-पॅपरात वाशिल्या हायदॅ अन टीवीओर बगीले पण हायदॅयोगायोगान त्या टायमाला तडॅ मींगेल लोप .ठीकाण लालबागसॉ नाकॉ . " तुमाला वाटॅदॅ आतॅ .पण हजर हॉतॉवाये, मींगेल बी कतॅ डबॅ पॉशव्या लागलॉ?"मींगेलनॅ तडॅ फुटपाथवर .पण ताहा कईस नाय . कावड उतरविलती अन केळे विक्या बॅहॅलतॉतॉजकल्या डब्यावाळयाई .खूप डब्यावाळे जमलोते .एकदासॉ प्रिंस चार्ल्स आलॉ . ओळख परेड खपली .नुसतॉ बगीतोतॉ मींगेल कवतीकाए .ओळख प्रिंसश्या हरी करॉन द्या लविलती. प्रिंस जा निंगालॉ आनखोशील्याला .आन त्या लक्ष फुटपाथश्या त्या बाजूला ऊबॉ अहलॅल्या मींगेलवर गॅला........ पोन्या, बिरविटल्याला खमीस आन डागावल्याला जाकिट, डोख्योरशी तीरकी जाल्याली काळी टोपी ऑहॉ अवतार बगॉन प्रिंसशे पाय जाग्योरुस थांबलेप्रिंससा . आपसुकुस त्याये .हॉन्या हारके पिवळेधमाक वेलचिए केळे बगॉन प्रिंसश्या तॉन्डाला पानी हुटलॉ .ध्यान मींगेलश्या पाटीओर गॅला पावले मींगेलदरी वळाले.

प्रीन्स दरी येता बरोबर मींगेलनॅ वेलचीआ एक कॅळा हॉकलॉन त्या हाता दिलाकर गॉड हा .गप खाला-प्रिंसनॅ ता गपा . प्रिंसनॅ .त्यानॅ आहा कॅळा आयुष्यात कतॅ खालास नॉता .वेलचीआ कॅळा खाऑन प्रिंस भलतॉस खुश जालॉ"ई कुहुना कॅळा हाय" आहा इंग्लीश मिनॅ विसारला, पण ता जकला मींगेलश्या डोख्योरनॅ निहारला. मग प्रिंसश्या दुभाष्यानॅ ई वेलचीआ कॅळा हाय आहा प्रिंसश्या कानोर घायलाया घती दोन हातात दोन पिकल्याले फनॅ टूकिले अन दुभाषाला मींगेलशे पैशे द्या -प्रिंसनॅ हाव . दुभाषानॅ पाश्शाई नोट काडली अन मींगेलला .हांगीलेद्या लावीली; पन नायत्यानॅ नुसते हात जोडले .मींगेलनॅ नोट घेतली नाय . अन बोयलॉ," इंग्लंडसॉ राजॉ ऑडया प्रॅमाए आमशे केळे खातॅ, त्यान आमश्या वसईशी शान वाडलीमाला पैशे नाका ., ई या कुपाई सगळा प्रिंसला कळला नाय पन दुभाष्यानॅ इंगलिश मिनॅ ज ."याआ प्रॅमाई भॅट समजा-कला त्या कानोर घायलालगेस . प्रिंसश्या डॉळयात पानी आलॉ, त्यानॅ मींगेलला वॅग मारली आन फाड – फाड दुभाष्याला इंगलिश मिनॅ कय तरी हांगीला . प्रिंस कार .ऑडया मीनॅ ई असनी बोठ्ठि लांब लसक काळी कार आली .दुभाष्यानॅ लगेस मींगेलसॉ पत्तॉ नावासकट लिवॉन घॅतलॉ .मीनॅ बॅहॅलॉ असता असता कार दिख्याशी रेली .मींगेल नुसतॉ मांगॅ बगीत रॅलॉ .

या गोष्टीला दोन मयने जालेप्रिंसशी बॅठ कही जालती ता हांगीलता मींगेलनॅ गावश्या जकल्या मीत्रांना ., पन कुनूस त्योर विश्वास ठोयलॉ नायमींगेल पुडी हॉडॉ नाका" जकले हांगात्यात ."तॉ तरी का करनार ., त्या दरी प्रिंस बॅठल्याऑ कईस सबूत नॉतॉबॅकेई नोटीस हायदॅ" मीत्र बोयले .मनी नसताना एक पत्र मींगेलश्या हातात पडला-पन एकदी घ्यानी .". पन ताहा कय नॉतालंडनसा -सोबतीला एक मुंबई .प्रिंस चार्ल्सश्या लग्नाई कंकोत्री होती ती .पाकिटात एक इंगलिश मिनशी कंकोत्री होती . विमानाआतिकीट हॉताती मात्र मराठीत होती (वाजव्याशी नाय हा) सोबत अजून एक शिटी होती ., प्रिंस चार्ल्सश्या दुभाष्यानॅ लिविल्यालीकंकोत्री अन विमानाआ तिकीट गावश्या .मींगेलसॉ हात आबाला लागलॉ .लला प्रिंसनॅ लग्नाला बोलविलतामींगे . जकल्यां .जकल्यां मित्राना मींगेलनॅ दावडला मीत्राए तोंडे कासूली हारके जालेइंग्लंडश्या राजाआ लग्नाला मींगेल खास पवणॉ . .म्हणून जाणार ऑहॉ गावभर बॉम्बाट पडलॉ

एकदासॉ तॉ दि उजाडलॉपरवासात खादो तिनॅ सामटयो अन करज्यो .याश्या गडबडीत होती-दुमीबाय मींगेलश्यो बॅगी भ . डबॉ भर डुकराआ इंदॅल पण द .करॉन दिल्योिलाहॉपारश्या बाजारातनॅ दोन नवीन .प्रिंसला भॅट द्यादो हुकेळे पण बांदॉन दिले . पोने, दोन खमीशे, दोन कब्जे आन दोन काळयो टोप्यो पण हाडल्योमींगेलसा लंडनला जासा टाईम जाला ताहा दापुडश्या सुकुर . मींगेलला पॉरपार नाय .या पुडॅ एक आमशे बापा आन तीन नमो मरिया भेटविले-मावलीआ आहा, पण गावश्या पॉरानुस नाक्योरसा रिक्षा हाडलाबाय जकला जाला आन एकदासॉ मींगेल-बाय-टाटा . लंडनवारीला निंगालॉविमानतळा पर्यंत त्या हरबर . .मींगेल विमानात बॅहॅलॉ आन विमान निंगाला लंडनला .सातुकाकाऑ पीटर आन बस्त्याव काकाऑ शिलु हॉतॉ

दुमिबाय जाम कातावलोतीसात दिहा करता प्रिंसश्या लग्ना गॅल्यालॉ तीऑ नवरॉ ., आज दोन मैने जाले तरी त्याऑ पत्तॉ नॉतॉफोन न .ाय, पत्र नाय, खबार नायमाऑ धनी कडॅ हायदॅ .तीआ शीतुस उडलोता .? कॉहॉ हाय दॅ? का करत्या हायदॅ?

INVEST IN FUTURE INVEST IN PROPERTY

# Liz Properties Pvt. Ltd.

**Builders & Developers**

**Mr. Prakash Pegado**

M- 9323639808

Residential & Commercial Complex

**Projects:-**

SAI NIWAS TOWER

SAI SAVLI TOWER

SAI HEIGHTS TOWER

SAI ASHISH TOWER

SAI DARSHAN TOWER

Tax & Investment Consultant

Shop No. 14 Riddhi Apartment, 1st Road,
Sri Prastha, Nallasopara (W).
Email: prakashliz2005@gmail.com

**With Best Complements From**

Baby Liz & Lynn.

Mrs. Nilima Pegado.

का खात्या हायदें? गा नुसतॉ पेतेस हायदेंआ? तीऑ धीर हुटात साललॉतॉ“ एक दी तिनें विसार कॅलॉ .आज कय बी करॉन याऑ पत्तॉ लाविलॉस पाय” तीनें उहयाखालशी लंडनवरनें आल्याली कंकोत्री .काडली .त्योर एक फोन नंबर हॉतॉ . पण तडनें बॉलणारॉ महानु .पाट केल्योर फोन लागलॉ-खूप खट .नंबर डायल कॅलॉ .मांगॉन हाडलॉ मर्शीबायश्या पोरिऑ मोबाईल “ समोरनें नुसता .दुमीबायाश्या पदरात कईस पडात नॉता .इंगलिश फाडतोतॉहुज स्पीकिंग” ऑडास बॉलातोतादुमीबायनें धीर . धरॉन त्याल‌ा वीसारला,“ माऑ नवरॉ मींगेल तडें हाया?”

उत्तर आला “तूमे कुन बॉलात्या?” कादोडी आयकीतास दुमीबायला बळ आला“ तीनें वीसार कॅलॉ .कादोडी बॉलातें मींजें माऑ नवरॉस ”! तिनें फोनवर गाळयाऑ सपाटॉ सुरू कॅलॉ“ समोरनें परत आवाज आलॉ .वयने, में मींगेल नाय बॉलें, तॉ आज हाकोटेस लंडनश्या नाईट क्लब मीनें नाश्या गॅलें“ ई आयकाता बरोबर दुमीबाय फोन वरुस सुरू जाली .वायेया काळा जालालो ...., नाशा गॅलेंआ, तॉकडया फराकातशी मॅडम बीडम पटविलें वाटातें यानें तडें .

नाय-नाय“, ताहा कईस नाय वैने, तॉ एकलॉस हाय आन खूप मजेत हाय .”आवाज!

दुमीबाय वैतागली,अरे“ , तॉ मजेत हायरें, पण में सजेत हायतीकोडयानें लाज बीज साफ होडलें वाटातें त्या ., गांडीआ हॉडॉन डॉख्याला बंदील्या हायदें त्यानें?” समोरनें परत आवाज आलॉ,वैने ताहा कईस नाय “ , मींगेल एकदम सज्जन माहानु हाय“ .ई तू माला हांगीताआ, अरे पंचविस पावसाळे काडल्यात त्याहरी मॅंदुम ”ीबाय आतें जामुस वैतागलोती तिनें पुडें . वीसारला, “ता सगळा रेऑंदेपण तू कुन बॉलाता .?” “वैने, माला ओळखिला नाया, में प्रिंस चार्लस बॉलातेंई आयकीतास .”! दुमीबायसॉ बोलूस गॅलॉ, ती जहीं एकशिती जालीतीआ मनात विसार सुरू जाले ., ”माला वाटला, ऑ लंडनला दोन मैने रॅलें तें आतें मस्तपैकी इंग्लीशदोन मैन्यात यानॅस प्रिंसला कादोडी भाषा .पण अडें उल्टा जाल्याला दीखातें .बींग्लिश हीकॉन येदें- आतें ऑ एकदासॉ घारा येऑंदे गा त्याई रायो आन मीठा ऑवाळॉन दीठुस काडतें थांब .हीकवीली! गुणाऑ माऑ नवरॉ!”

ई कानी काल्पनिक हाय), पण भॉळयाभा-ळया कतें खरी जें जाली तें एक पन कुपा-याला नवाल वाटया पा नाय(

**<u>सिरील मिनेजीस, आगाशी</u>**


आयस्क्रीमशे प्रकार ओब्ड्ये दुकान फक्त एकुस

आयस्क्रीमशे दुकान ओब्ड्ये कुपाऱ्या दुकान फक्त एकुस !!!...

# वेलंकनी आयस्क्रीम पार्लर, वाघोली





अमूल, विन्डीस,दिन्शो, फेस्टिवल

**नाताळशा हणाकरता खास**

# क्वालिटी वॉल्स

**या नाताळशा हणा रजेत एकदा भ्येट द्या वेलंकनी आयस्क्रीम पार्लरला**

**संपर्क :- पीटर फर्नात – ९९८७७१२१३३, रुपेश लुझार - ९३२२८९४८१९**

# प्रेमळ स्मरणार्थ



## ख्रि. लॉरेन्स पॉल रिबेलो

**चौकाळा**

**जन्म :- ११ डिसेंबर १९५०          मृत्यू :- ०७ नोव्हेंबर २०१०**

प्रभू म्हणतो " मृत्यू हा जीवनाचा अंत नाही तर सार्वकालिक जीवनाचा प्रारंभ आहे"
प्रभूच्या राज्यात तुम्हाला चिरंतन शांती लाभो हीच प्रार्थना!

**--- कुटुंबिय**

---

तीः आयकात्याआ, मे हांगाते, ओडे वहरे या आपल्या संसारापायान नाय आपुन कडे गेले, नाय आले.

तोः मग आते का लंडनला जासा गा का?

तीः लंडनला पन पोरे धाडद्यात! पान आपुन अडसापान खूब बग्यासा बाकी हाय. आपुन कडे फिर्‌यादो गेलोशे ते!

तोः कडे जासा बोल..!

तीः ती पहरावशी बाजीबाय, जवतळ्योरशी मर्शीबाय, पडाईशी मरी आन तिओ नवरो ए जकले दिल्ली-आग्रा, मथुरेला जाओन आले.तो गोहळीसो

अंतोन परेरा मास्तर आन होमाडीसो संज्याव घोन्सालवीस जकाल्यांना घेओन गेलते. खूब-खूब बगीला हांगते त्याई, जाम मजा आली हांगाते.

तोः मग आपुनपन जाव गनी!

तीः आते ते जानेवारीला गोव्याला, फेब्रुवारीत नाशिकला, मे मयन्यात सिमला-कुलू मनालीला आन महाबळेश्वरला पन जाशे हात. आपुनपन नावे देव.

तोः तू नावे दे बास. माइ तयारी हाय.

तीः मग मी आजूस, "**जेरुसालेम टूर्स & ट्राव्हल्स**" मीने नावे देते.पहरावश्या मर्शानला हांगीला गा काम होयदे. जेरुसालेम देवासा निवडल्याला हॉता. तहे इ सहल नेनारे पन निवडल्याले दिखात्यात. मे आजूस नावे देते.नाय ते फोन केलो तरी सलदे.

| | | |
|---|---|---|
| अंतोन परेरा | संज्याव घोन्सालवीस | मर्शान रॉड्रीग्ज |
| ८०८७२०६९१७ | ९३२०८८८९०७ | ९२७०६३०१०३ |

# "ओलांडा - एक काळ रात"

'स्टीव, हयरा कतें करेंसा रें ? रॉजरने विसारला .....'थांब रें रॉजर, राजोडीला आला गा... जरा मस्त काहा वारा खासा गा नाय .... तें तु वराडल्या भगुन आम्श्या मागें कादो लागल्या? ...अरें मस्त काहा फ्रीडम एन्जॉय करूदे.....स्टीव , 'फ्रीडम' मिनें ता सगळा येतें आ? रॉजरने स्टीवला टोमनों मारलों, स्टीव हाआलों ..."जवान पोरे हात आमें , इट्स पार्ट ऑफ़ बैचलर लाइफ ....हा पण रॉजर तुस हांगरें मा इंजीनियरिंग नंतर बजाजमिने MBA आणि इंडियन ऑइलला आईटी मैनेजर.... २५ लाख रुपासा पैकेज ... माला पोरी कही थोड़ी हायर एजुकेटेड पाय गनाय .... अमेरिका नाय ते लंडनला MS वैगरे केलेली .....

ओडयात राकेश हाआलों... हातात बंड्या अड़ने वडें घेवोन... मस्त '3 इडियट्स' समुद्रोर वडा-पार्टी करें बेहले..... राकेशनें विषय काडलों...'तुमाला कय माईत हाय गा?, बोलिंज होडला आणि ओलांडा आला गा तड़े राती एक बाई उतरातें ती ....' पांढरी साडी... केस मोकळें होड़लेलें ...हातात बांगडयो आणि पायात पैजण ....डोख्योर पेटलेली मेनवात'..... आणि हा फ़क्त एक मयन्या प्रेग्नंट बाईलास दिखातें ती ....ओलांडा पुलापा मागें एक एक्सीडेंट जालता ... चालपेठला बिल्डिंग मिनें रेनारी एक २४ वहराई पोरी ...जस्ट मॅरिड जालेली ....एक मयन्याई प्रेग्नंट होती आहा हान्गात्यात ... तिऑ आत्मों पोट्सा पोर शोदितें...मनून फ़क्त राती त्या रस्त्योर नें येनारया-जानाऱ्या एक मयन्या प्रेग्नंट बाईलास ती दिखातें .....

'मस्त टाइम -पास स्टोरी ..... तु लिविले गा '....स्टीवनें राकेश ला हान्गिला .....वडें खपलोतें आण भूताऑ विषय पण .... अड़े स्टीवश्या घरशे त्या मागें लागलोते.... हयऱ्या करता ...स्टीव सो मामा अन्द्रेस ....त्याऑ मित्र जाकोब... जाकोब शी पोरी जेनी अमेरिकेला MS करतोती.....१५ दिहान येणार होती अमेरिकेतने वरने MS कम्पलीट करोन.... अन्द्रेस मामाने स्टीवसा मन वलविला अरे तुला पाय तहिस हाय आली गा एक दा भेट घें ... मग पुडसा पूडें.. पायदें तें तुमश्या फेस बुक वरनें चॅटिंग करा .....स्टीवला पटला....FB वर जेनी लोकेट जाली ....what a beautiful girl? स्टीव खुश जालो .....जेनी आतें येतें कतें? ... स्टीवला उतळी पडली हयऱ्याई .....

आज सन्डे ....कालुस जेनी अमेरिकेतनें घारा आगाशीला पोसलोती....आज भेटयासा ठरलोता...भेटयादो स्टीव खुप उतावित होतों आणि थोडों नरवस् पन ....यशवंतनगरला एक मस्त रेस्टोरेंट निगाले...कुन कुपारी नहात्यात तड़े... तों स्पॉट नक्की जालतों.... जेनीओ अंकल तिला घेऑन आलतों....दोगा बोलना जाला... स्टीवला तर जेनी FB वरुस आवडलोती... खरा हान्ग्यासा तें पोऱ्यो दिखात्यात सादारणशोस पान FB वर फोटो मात्र रापचिक टाकीत्यात ...अड़े उल्टा जालता ...जेनी तर एकदम प्रीटी ज़िंटा... तिआ गालोरश्या खळी मिनें स्टीव क्षणभर अडकालों ...गप्पा जाल्यो..दोगाई लाइट नाश्तों केलों ....स्टीवने अंकलला हान्गिला तुमे पूडें निगा... में जेनीला घारा होडतें ...जेनीनें मस्त स्माइल दिला .....

रातीयें साधारण ८ वाजलोतें....स्टीव आणि डबल सीट जेनी ..... ओलांडा क्रॉस केला आणि स्टीव नें जेनिला हान्गिला अड़े एक भूत उतरातें आहा माला माऑ मित्र राकेश नें हान्गिला........."एकदम इंटेरेस्टिंग.....तीऑ कॉशचूम पन इंटेरेस्टिंग.....पांढरी साडी... केस मॉकळें होड़लेलें... हातात बांगडयो" स्टीव पुडें कय बोलें तों जेनीनें स्टोरी कंटिन्यू केली....".हा आणि पायात पैजण .... डोख्योर पेटलेली मेनवात". अरें ती बाई में काल बगिलती.....एअरपोर्ट वरनें राती यादो १ जालतों ...दादा कारनें ओलांडा क्रॉस करताना में तिला ओलांडोर झाडाखाला उबी होती तिगाला बगिलता.... माला वाटला कुन वेडी हायदें........कर्र कर्र........... स्टीवनें गाड़ीऑ ब्रेक मारलों ....."जेनी खरा हांगाता गा तुला कुनें स्टोरी हान्गिले" ....."नाय रे खरास हांगातें.... आणि तु माव हा आतें ... तुला कादो खोटा हांगों".....

स्टीवश्या गाड़ीऑ स्पीड कमी जालतों आन त्या आंगाला काटें आलतें .....राकेशशी स्टोरी आठवाली त्याला ....'त्या बाईऑ आत्मो पॉटसा पोर शोदितें... म्हणून फ़क्त राती त्या रस्त्योरनें येनारया-जानाऱ्या एक मयन्या प्रेग्नंट बाईलास ती दिखातें'.... जेनीनें मागशे २ वहरे अमेरिकेला काडलोते ....स्टीवश्या भाषेत 'फ्रीडम '......स्टीव सा डेफिनिशन त्यालास आठवाला ....'जवान पोरे हात आमे ...इट्स पार्ट ऑफ़ बैचलर लाइफ '.... स्टीवने जेनीला आंगल्यात होडला ... घारा जावोन हान्गिला ....माला पोरी पसंद नाय ....त्याई लाइफशी डेफिनिशन बदललोती ........

**- सचिन मेंडिस, बोळिंज**

Mob : 9892526628

Resi. Ph : 0250 2589006

charlesdmello77@gmail.com

**Charles M. Dmello**

B.Com. LL.B.

**ADVOCATE HIGH COURT**

Office :
Shop No.31, "B" Wing,
New Simla Co. Op. Hsg. Soc. Ltd.
Station Road, Near Flyover,
Nallasopara (W), Thane - 401 203

Resi :
Catherine Niwas, At: P.O. Agashi,
Don Talav, Vatar, Via. Virar, (W.Rly.)
Tal : Vasai, Dist : Thane - 401 301

---

JOHNSON TILES
*Not just tiles, Lifestyles.*

SOMANY
World of Tiles

**Pr.-Allwyn Rodrigues**
Mob: 9822796769
9975781973
Tel.: 6810601
Parsav-Nandakhal

**ALLWYN TILES**

Marbonite

Porselano (Joint Free)

Kajaria
Create Grow Innovate...

TIMEX
architectural ideas personified !
IMPORTED FLOOR / WALL TILES

Nilgiri Bldg., Shop No. 11, Loda Nagar, Station Road,
Near Patankar Park, Nallasopara (W), Pin - 401 203.

# दादीई (आईची) श्रद्धा

आपल्या अडे सध्या पद्धत आले कि मे महिनॉ आन दिवाळी रजॅत कडेतरी पोरांना घेऑन पिकनिकला जासा. मग ता स्वतः हो किंवा एखाद्या टुरतर्फे !!!!! तहास आमसा १३ जना कुटुंब एका टुरतर्फे मागश्यावहरा काश्मीरला फिरॅ गेल्ते. जाताना आमसॉ प्रवास मस्त जालॉ आणि तडॅ आमी १० दि काढलॅ. सगळा अगदी आनंदी आणि मजेशीर सल्लोता. पोरे आणि दादी एकदम खुश होते कारण काश्मीरसा निसर्गसौंदर्य आन त्या बरफोर्शी मजा... सगळा मस्त सल्लोता... आतॅ परत यासा हॉता तर आमी ठरविला कि बसनॅ घाट उतऱ्या लागॅ आणि दादीनॅ पण कतॅ पुढे विमानात बेहे, तर आपुन सगळे विमानातनॅस दिल्लीला जाऑ. तहे आमी विमानाये तिकिटे काढले..... श्रीनगर तॅ दिल्ली.

मग आमी १९ मेला हाकोटे १० वाजता श्रीनगर एअरपोर्टवरनॅ दिल्लीकरता विमानात बेहले कारण आमाला ३ वाजता दिल्ली-मुबई राजधानी पकड्याशी होती. आमी दिल्लीला पोसले तडॅ तर खूप गराम वाट्या लागला कारण आमी श्रीनगरशा ६ डिगरीतनॅ दिल्लीया ३९ डिग्री वातावरणात पोसलोते. आंमी ३ गाड्यो केल्यो आणि ४-४ माहणे एक-एका गाडीत बॅहॉन दिल्ली स्टेशनला पोसले. वातावरण गरम अहल्यामुळॅ मा पोराला दिल्ली स्टेशनवर चक्कर आली आन तॉ खालास पडलॉ.... दादीनॅ त्याला वेंग्यात घेटला, आन त्या डोख्योर हात ठोऑन प्रार्थना सुरु केली. आमे तोपर्यंत स्टेशनला पोसले. मग मॅ त्या तोन्डोर पाणी मारलॉ आणि त्याला रेलवे थांब्याशा ठिकाणी नी, तडॅ एसी हॉता..... मग मा पोराला जरा बरा वाटला....

आतॅ आमी ३ वाजता दिल्ली-मुबई राजधानी गाडीत सडले... आमशे सगळे मेम्बर जॅ श्रीनगर तॅ दिल्ली गाडीनॅ येणार होतॅ, ती गाडी लेट झाली.... आण आमशे तिकिटे त्या टुरवाल्या दरी होते...... आतॅ का करॅसा.... पण आमॅ धीर धरलॉ.... का हॉवॅ ता हॉयदॅ, आहा करॉन आमी गाडीत बेहले... आमशे अजून मेम्बर न आल्यामुळॅ गाडीऑ डब्बॉ खालीस होतॉ.... एक-दोन स्टेशन गेले.... आतॅ टिसी आमशा डब्यात सडलॉ आन आमाला तिकीटाबद्दल विसारला.... आतॅ का करॅसा..... आमी त्याला खूप समजावॉन हान्ग्यासॉ प्रयत्न कॅलॉ ... कि आमशे तिकिटे मागॅ गाडी लेट झाली, त्यातशा एका माहणा दरी रेल्यात मनून... पण टिसी कय आईक्यादो तयार नॉतॉ.... तॉ हान्गातॅ तुमशी फॅमॅली हाय मिंजे तुमी तिकिटे काढले हायद्यातुस..... पण तुमश्या दरी कय लेखी प्रूफ नाय त्यामुळॅ मॅ आतॅ कय करू शकॅ नाय, आतॅ तर तुमाला ३ हजारा हिशेबानॅ ४४ हजार रुपये दंड भरॅ लागेदॅ..... दादी, माई बाईकू आण माई बेन खूप घाबरले आतॅ तर त्याई बायबल काडॉन वाशॅ सुरवात केली....

अडे मॅ आण माऑ भावजी त्या टीसीला पटव्या लागलोते..... पण तॉ आमसा कय आईकोंनुस घ्यादो तयार नॉतॉ.... थोडी बाचा-बाची झाली.... अडे दादी, माई बाईकू, माई बेन या बायबल वाचन सालूस होता.... आमशी ई सगळी बाचा-बाची एका पुढ्श्या सीटवर बेहेलेलॉ माहणु आईकातोतॉ... तॉ आमाला बोयलॉ, तुमश्या दरी तिकीटाये नंबर हात गा? मे मा लॅपटॉपवर चेक करतॅ, त्याला आमी आमश्या तिकिटाव नंबर दिलॉ... त्यानॅ लॅपटॉपवर बगीला आमशे तिकिटे होते पण टिसीला लेखी प्रूफ पावतॉ..... तर त्या भल्या माहनाने त्या मित्राला आमश्या तिकिटाव नंबर दॅऑन पुढ्श्या स्टेशनवर त्याई प्रिंट काडॉन हाड्ड्या हान्गीला..... रातशॅ १२ वाजलोतॅ.... आमाला वाटला त्याव तॉ मित्र कय प्रिन्ट घॅऑन यॅणार नाय..... पण ती व्यक्ती आमशी गाडी स्टेशनला पोस्तास आमशा डब्या पुढे आली ... आण त्यानॅ आमाला आमशे तिकिटे दिले... त्या व्यक्तीला आमॅ पैशाई ऑफर केली पण त्यानॅ आमश्या दरणॅ पैशे न घॅता निघोन गॅलॉ... आमी ते तिकिटे टिसीला दावडले आन आमशी हुटका करॉन घेटली .......

अडे दादी, माई बाईकू आन माई बेन या बायबल वाचन सालूस हॉता..... वचन हॉता कि "तुमी माझे आहात; मी कधीच तुम्हाला एकटे सोडणार नाही. मी तुमच्या बरोबर आहे कारण मी माझ्या तळहातावर तुम्हाला कोरले आहे" दादिया त्या देवावरच्या प्रचंड विश्वासामुळेस प्रभू ख्रिस्तानॅ त्या व्यक्तीला आमशा मदतीला धाड्लोता आणि खरोखर प्रभू ख्रिस्त गोर-गरिबाव कैवारी हाय..... तॉ कुनालास टाकॉन दे नाय ई आमाला त्या वेळी पटला ...

**रॉबर्ट फर्नांडीस, फर्नाद आळी**

जॉनी तुस्कानो मोबाईल ९८२२१४८१८९

मायकल मच्याडो ९८२२३१६१४६

कार्यालय ९५२५० - ६५२४५८९

**ALMAC**
**Batteries & Inverters**



**उत्पादन आणी विक्री:** सर्व प्रकारच्या Batteries, Inverters, U.P.S आणी Stabiliser

---

**पत्ता:** भंडार आळी, नाळा शेवटचा थांबा, नाला-सोपारा (प.) ४०१ २०३

---

जॉनी तुस्कानो मोबाईल ९८२२१४८१८९

मायकल मच्याडो ९८२२३१६१४६

कार्यालय ९५२५० – ६५२४५८९

**ALMAC**
**Solar Water Heater**



**"सरकारी अनुदानासहित"**

वीजेची, ग्यासची आणी वेळेची बचत/ २४ तास गरम पाण्याची सुविधा

---

**पत्ता:** भंडार आळी, नाळा शेवटचा थांबा, नाला-सोपारा (प.) ४०१ २०३

# येदयात गा तॅं दि परत...?

बेहलतॉं दापुडशा हिंदाळ्यात
कोडा बदलले जगणा,
विसार केलो येदयात गा तॅं दि जीवनात बगीता

हाकोटे ऊठॉन दोपारा शाळीत जश्या आदि
हळाम्बॉं-टोपला लावॉन आतॅं
खेळता येदॅं गा बॅटबॉल आंगळ्यात
आत्याशे पोरे येदयात गा खॅळॅंदो..?

दोपारशे शाळीतनॅं आल्योर
शिशा झाडाखाला चन्यो-गोटॅं, भोवरॅं खॅळ्या मिळदॅं गा...
आते शिश्या झाड आन पोरे मिळद्यात गा खॅळॅंदो..?

हान्शे शाळीतने आल्योर
चोर-पोलीस खॅळॅंदो जुने कुडाये घरे हापाडद्यात गा,
आते पोरे येदयात गा गावबर पळॅंदो..?

निम्बरात लगोरी, बॅटबॉल खॅळॉन झाल्योर
भर निम्ब्रात भाटातशॅं आंबें पाडॉन खाता येदयात गा..
भाटातशा बावखालात पोअता येदॅं गा
आते पोयेदो येदयात गा पोरे आन मिळद्यात गा बावखाले...?

पाहाळ्यात भाटातशा भरल्या बाईत
दोपारा पोयासा हिक्यादो मिळदॅं गा,
आते पोरे येदयात गा पोयाशी हव्व्यय कऱ्यादो...?

हान्सा आंगळ्यातशा भिजल्या मातीत
कबड्डी, विटी-दांडू, खॅळ्या मिळदॅं गा..
आतॅं मातीत निप्यादो पोरे येदयात गा

वरशे खेळ नायुस जमलॅं तॅं
जुन्या घरा बोठ्या ओट्योर
चप्पट, खुब्र्यो, पत्ते आन लंगडी इ तरी खॅळता येदॅं गा...
ओट्योर खेळापुरता तरी पोरे बार येदयात गा..?

धान त्योर शिसवणी कालवण आन
आगीयोर बुजीलेलॉं हुक्को बुम्बुल
मिरी, लहून, विलान्ग्री मीने ठेशिलेलॉं खाय्यात गा पोरे..
आत्याशा पोरांना ते सव कतॅं कळद्यात गा..?

राती लाईट गेल्योरे नातॅं जीवाण जाल्योर
हिंदाळ्यात बॅहॉन भेन्ड्यो खेळ्या आव्डेद्यात गा..
आते पोरे शारसोगात गाणॅं बोलद्यात गा..?

इ सगळा तीगाळा केला, अनुभविला
मनून पोरे आनंदी रॅंशे..
पोरे खॅळोन थकॅंशे..
मंग त्यांना भूक लागोन ते बक्काट जीवॅंशे..
मनून पोरे शिक नाय पडॅंशे...

पोरांना मनाने, आत्याशा आयबापाई शिक पाडोन ठुविले...
कारण आते जग बदालला, घर बदालला..
आते आन्गाळ, ओटो नि झाडे बारके जाले..
खॅळॅंदो पोरांना मोबाईल गेम, टीवी, कार्टून नेटवर्क, वीडीओ गेम
खादो चोकलेट, चिप्स, चायनीज, लॉलीषॉप
यातूस आपुन अड्कावॉन ठुविलॅं...
ये दि बदलद्यात गा..
पोरे आन्गळ्यात खेळद्यात गा..
येदयात गा तॅं दि पुना एकदा...?

**-- एडवर्ड डिसोझा, सोज आळी**

# फोन आलॅं

घरात आपल्या फोन आलॅं
फोन आलॅं माला फोन कर लो ॥ धृ ॥
निरोप तुझो तॉं माला मिळालॉं
अर्ध्या राती मॅं फोन तॉं कॅलॉं
पोरे आपले निज्लोते ना
निज्लोते ना तुला नीज नोती ना ॥१॥
आवाज तुझो तॉं आयकॉन माझॉं
जीवासॉं जीव तुझॉं झालॉं राजॉं
घडीभर बोलॅंशी ती होस होती ना
होस होती ना राती नीज नोती ना ॥२॥
हाकोटे हाकोटे कामोर गॅलॉं
हान्शा पारा मॅं फोन तॉं कॅलॉं
पोरे आपले घरात होते ना
घरात होते ना वाट बगीतोते ना ॥३॥
बोलॅंदो वाटातोता बयशा बरोबर
फोन कॅलॉं मॅं आठ दिहावर
बय वाटातॅं थोडी नाराज होती ना
नाराज होती ना बरा मागातोती ना ॥४॥
घरात आपल्या फोन आलॅं
फोन आलॅं माला फोन कर लो

**.-- एलायस परेरा, गास (भाटोरी)**

BASSEIN Holidays

* आजपोत असंख्य कुपाऱ्याना कुपाऱ्या हारकी सैर करोन हाड्नारी एकमेव Bassein Holidays
* लगीन जवळ आले......फिऱ्यादो कडे जासा?
* पोराई परीक्षा खपली गा आपुन कडे फिऱ्या जासा?
* या दिवाळीमीने आपुन कडे फिऱ्या जासा?
* नाताळ आले कडे फिऱ्यासो बेत कऱ्यासो?
* आते मे मयन्याई हुट्टी लाग्याशी कडे जासा फिऱ्यादो?
* अरे २ हुट्ट्यो एका मागो माग आल्यात कडे Short - Trip माऱ्याशी गा?
* आते मे रिटायर जाले माला आते फिऱ्यासा हाय...
* लग्नाला पुडश्या मयन्यात २५ वहरे पुरे होत्यात, कडे फिऱ्या जाय गा?
* मद्रासला जासा हाय, विमानाये तिकिटे बुक कऱ्याशे हात?
* लंडन/अमेरीकेला पोरा दरी जासा हाय, तिकीट बुक कऱ्यासा हाय?

या जकल्या प्रश्ना उत्तर घेओन **Bassein Holidays** आले. इ एकमात्र कुपारी कंपनी हाय जी आपल्या या जकल्या प्रश्ना उत्तर सोप्पा करते. तर फिऱ्याश्या बाबतीत कय पन सर्विस पायदे ते आपलोस एक कुपारी निक्सन डि'मेलो ९१६७२१६४११, ९७६८७१५८६६ वर उपलब्ध हाय.

**"कुपाऱ्या उज्ज्वल भविष्याकरता कटीबद्ध"**

* आपल्याला आपल्या कुटुंबा सुरक्षेकरता L.I.C. इन्शुरन्स घ्यासो हाय?
* आपल्याला पोरा-पारा शैक्षणिक भविष्याकरता गुंतवनुक कऱ्याशी हाय?
* आपली रिटायरमेंट प्लानिंग सुयोग्यरित्या कऱ्याशी हाय?
* होन्यामीने (Gold) दर मायन्याला रिकरिंग टाइप गुंतवनुक कऱ्याशी हाय?
* आपल्या बजेटमीने (६ लाख/८ लाख/१० लाख) जमिनीत सुरक्षीत गुंतवनुक कऱ्याशी हाय?
* आपल्याला आपलो TAX वाशव्यासो हाय?

मग आपलोस एक कुपारी प्रशांत डि'मेलो ९५२७११००११, ७५०७८०६६९२ वर उपलब्ध हाय.

**Investment & Finance मीने कय जरी सर्विस पायदे ते एकूस कुपारी नाव**

OASIS MONEY FINANCIAL Planning Service

**Smart Solutions for Everyone**

***Life Insurance* Medi-Claim *Mutual Funds *Gold Investment *Company Fix-Deposits *Home Loans *Real Estates *Tax Planning**

**OFF:Shop No 10,Garden View Apt.,Opp.Virat nagar Garden,Nr.M.Baria Devlopers Office,Virar(w)**

# तरी ती माईस पोरी

ती माई पोरी, लगीन जाला आन हा-या गेली,
घरातसों जकलो किलबिलाट हरी घेऑन गेली,
आमश्या डॉळयापुडे नुसता दुखा...दुखा पडला,
गडखीभर आमाला पुडसा कय दिख्यासास रॅला,
जीगाळा लगीन जाला आन हा-या गेली
ती माई पोरी.......

तिओ बावल्यों, तीओ त्यो टिकल्यों, नेलपॉलिश,
तिओ वहयों/पुस्तके, तिए ते कलर,
तिए आवडते कपडे, तिने "मातृ-पितृ दिहा" आमश्या करता बनविलेले कार्डे,
कुनुस आहॅं नाय, बॉले नाय गा साले नाय,
सगळयाआ तॉन्डात जहीं 'मुग' वयरल्यात....!
गेली तॅं गेली, पन सागळयाना 'स्टॅच्यू' करॉन गेली,
ती माई पोरी.......

लानपनापासून नुसती नाजुक पन गुटगूटीत जहीं "ती फूलराणीस..."
तिगाळापासून अडॅं तीआस राज....हॉता..... आख्खा घर डोख्योर घ्याशी.....
जरा कडॅं गेली गा जकल्यांआ तॉन्डसा पानि पळयासा.....
तीआ बॉलना, रडना, आहाना, खॅळना,
आख्खा घर नुसता आहाता खेळता ... जीवंत ठॉव्याशी....
ती माई पोरी.......

आमश्यों कान्यों, मुकाळॅं-मुकाळॅं हांगील्यालों वार्ता,
आमशी थट्टा-मस्करी, शीडवा-शीडवी,
देवळात जाना, बायार फिरना, खरेदीला जाना,
एक-मेकाए स्वप्न, गिंता (चिंता) एकामॅकांना हांगना,
"वीस-पंचवीस वहरात.... आपली पोरी,
आपल्याला का-का देतॅं याओ हिसाबुस नाय" ......
ई माला ती गेल्योर कळया लागला...
मया देते, धीर देते, आपल्या करता तीस हळवी हॉतॅं ........
ती माई पोरी.......

अरे, ऑजा कडसा.... ता फूलपाखरूस आपला खरा धन हाय,
ई सत्य माला आतॅं पटला, जिगाळा लगिन जाल्योर हा-या गेली
ती माई पोरी.......

पन आतॅं तिनॅं पन एक जाळा विण्या घॅतलॅं,
ता जाळा एक नवीन रंग घॅनार हाय,
आमश्या आनी तीआ जाळयात खूप वेगळा-पन अहनार हाय
नवीन नात्यात गुंतली जानार हाय,
ती माई पोरी.......

तीआ नवीन नाता सुंदर तरी पन वॅगळा अहनार हाय ई माला समजालॅं.....
एकमेकांपासून आतॅं आमे थोडे लांब जानार हात ई पन माला उमजालॅं....
आनी बुघुनुस 'आयुष्यात पोकळी निर्माण हॉतॅं मींजे का?' ता आतॅं माला कळालॅं

तरी ती माईस पोरी.......!


**राजन डिमेलो, रोजरी परिवार, आगाशी**

## देणगी देणारे दानशूर"

1. जेम्स बॅटरी - रु. १०००
2. एरिकसन लोजेस्टिक्स - रु. १०००
3. डॅनिश क्लिअरिंग - रु. १०००
4. श्री. आलेक्स घोन्साल्वीस - रु. १०००
5. श्री. बर्नड लोपीस - रु. १०००
6. सारा & सारा टुर्स & ट्रावेल्स - रु. १००० (०९३७११९०३०३)
7. श्री. लुकस तेलीस, गास – रु. ५००
8. एम. के. शाह ज्वेलर्स, वसई - ५००
9. स्वागत रिसॉर्ट, अर्नाळा – रु. ५००
10. अनामिक, वटार - बारोडी रु१५००.
11. अनामिक, मशाद रु५०० .
12. अनामिक, परसाव रु१०००.
13. अनामिक, दोनतलाव रु२०००.
14. अनामिक, बोळींज रु१०००.

be u-r-self

# integriti




**integriti**

**: UNIQUE RASHMI SHOPPING CENTRE, BELOW VIJAYA BANK, AGASHI ROAD, VIRAR (W) PH : 9860020879 & ALL LEADING STORE**

# कुपारी खाना

## १ पुहु

सामान : एक लिटर शिक् दुद, शारशे ग्राम हाकर, शार अल्शो, जाय्फालाई भुकी शिमटीभर

कहा काऱ्यासा: एका पशंडीत शिक् दुद घ्यासा त्यात हाकर विताळवॆशी, अल्शो गा जाय्फालायी भुकी घाल्याशी आन भोटया पशान्ड्यात बॉट्भर पानी घालॉन शिक् दुदाई पशंडी त्यात थोव्याशी. सुलीओर ठोवॉन वरणे धाखान ठोव्यासा. अर्ध्या तासात पुहु तयार. कडाकशे कडाक.

## २. दोदाल :

गाय, भय व्येलेली हायदॆं तॆं न निवडलॅला तीन शार दिहासा सलदॆं.

सामान : एक लिटर दुध, अरदॉ किलो सावळावं पीठ, पाव किलो पांडरा गॉड, अल्शो शार

कहा काऱ्यासा : दुदा मिनॆं गॉड घालॉन विताळवॅसा, सावळाव पीठ घ्याल्यासॉ त्यात अल्शो टाक्याश्यो. आतॆं सुलीओर ठोव्यासा आन दानडयाय घाटीत रॅसा. घट होत आला गा डॅवऱ्यासा. आन एकेक उल्कीयॆं थाळीत नातॆं बशीत घालॉन ऊना ऊना खादो दयासा. बॉटाय सुम्ब्यासा, थाळीत बॉट माऱ्यासा आन तॉडात घाल्यासा. याला हान्गात्यात बोटे सुम्ब्यासा दोदाल.

## ३. ननडूल्यो :

सामान : दोन टिपरी सावळावं पीठ, एक हुक्यो नाळ, शिमटीभर मिठा, अरदो किलो गोड (कमी जास्ती सल्ये), तूप १०० ग्राम

कहा काऱ्यासा : दोन मापे पाणी घॅवॉन त्यात मिठा, सावळाव पीठ आन नाळाआ हिरा घालॉन पीठ बाफ्यासॉ. बाफिलॅल्या पिठाय बारकॅ बारकॅ लाम्बाट ऊंडॆं कऱ्याशॆं. एका पशंडीत तूप टाकॉन त्योर गॉड टाकॅसा, गॉडाव पाणी जालॉ गा त्यात यॆं बारकॅ लाम्बाट ऊंडॆं, अल्शो, जायफालाई भुकी टाक्याशी आन दांडॅय हस्तॅस घाटयासा. गद् गद् जाला गा डॅव्र्यासा. गॉडाआ पाण्यात बारकॅ लाम्बाट ऊंडॆं बुडलॆं पात.

**तेरेजा थिओफिलो डिसोजा, कांदोक नं. १, गास**

# आपलॉ बाबुकाका

बाबुकाका मिंजे एक वल्ली होतॉ. हाकुटे उठ्यासा, १० वाजले गा मरीला कय खोटा नाटा हांगॉण तळ्योर खोपटात प्यादो जासॉ, परत हाम्च्यापरा ५ वाजता तराड हॉवोन सगळ्या आईशी मायशी काडीत रस्त्यावरणे इलात घरा यासॉ. त्या गाळीतनॆं कुत्रेपण वाश्याशे नाय. घारा मात्र बरोबर पोश्यासॉ. मंग मरीबाय त्याई आणि दारूवाल्याई उद्धार कऱ्याशी. आहा नेहमीसा झालता.

बाबुकाका बोलण्यामीनॆं वस्ताक हॉतॉ. पिल्यामीनॆं पण बोलण्यात सुक्यासॉ नाय. एकदा का झाला आपलॉ ओ बाबुकाका पॅऑन घारा येतोतॉ नेहमीप्रमाणे सगळ्याव उद्धार सल्लॉतॉ. सगळे कहे कामाय नात आणि मायी ओळख कही बोठी हाय इ जकल्याणा ओर्डोन हांगात स्वारी नाक्योर आली आणि तडे बेहलेल्या कोळणीला बगीत पुढॆं जाताना खाला बेहलेला कुत्रा कय त्याला दिखला नाय आणि बाबुकाका खाल्श्यावर पडलॉ. त्या कुत्र्या बयसो उद्धार करीत कहोभहो उठलॉ. उठताना दोनदा पडलॉ पण उठलॉ आणि पायासा पायतान पायात घाल्या लागलॉ तर ता कय जात नॉता. कोशी आपल्या नातवाला पाटील डॉक्टर दरी नेवॉन येतोती तिने बाबुकाका पायतान बगीला आणि त्याला हाक मारली "कुण्यानदो तुमसा चप्पल रस्त्यावर पडलॆं आन् तुमे अनवाणी सालले ते?" त्योर बाबुकाका तिला हान्गाते "त्याला पायदॆं तॆं तॉ घारा येदॆं नायतॆं गॅलॉ उडात. कोशीला वाटला कडशाकडॆं याला हान्गीला .

# वाघोली सहकारी डेअरी सोसायटी लि.

सुवर्ण महोत्सवी सहकारी संस्था (१९६२ – २०१२)

वाघोली, पोस्ट – निर्मळ, ता. वसई, जि. ठाणे, फोन – २४७०२२८

- **दूध उत्पादक शेतकरी सेवेपासून सर्वोपयोगी ग्राहक सेवेची सुवर्ण महोत्सवी वाटचाल**
- **शेतीसाठी खते, बी – बियाणे व औषधे विक्री केंद्र**
- **बांधकाम साहित्य (सिमेंट, पत्रे व लोखंड) व इतर ग्राहकोपयोगी वस्तू पुरवठयाचे मध्यवर्ती केंद्र**

| चेअरमन | व्हा. चेअरमन | सेक्रेटरी |
|---|---|---|
| श्री. रोमन फर्नांडिस | श्री. हरीचंद्र पाटील | श्री. आलेक्स निग्रेल |
| ८८९८८४५५२८ | | ९१५८९५९१९६ |

नाताळशा हणायो जकल्या कुपाऱ्यांना शुभेच्छा

सौ. सेवरीना पॉल रिबेरो

श्री. पॉल फ्रान्सिस रिबेरो

कॅरिटा आन प्रिस्टर्न रिबेरो

फिनिक्स

पीलघर, उमराळा

बाबुकाका तॉहॉस घारा आलॉ. मरीबायने एका पायात चप्पल नाय इ बगॉन बाबुकाका धॉपटॅ लाविलॉ तर तो वर तिला हान्गातॅ "त्याला पायदॅ तॅ तॉ घारा येदॅ अङॅ. अडे, कोशीने तिया नातवाला ता चप्पल दॅवॉन बाबुकाका घारा धाडला तिऑ नातू ता घेऑन बाबुकाका घारा गॅलॉ आणि मरीबाय्श्या हातात दिला. इ सगळा बगोन बाबुकाका ओटयोर खाट्यात पडल्या पडल्या मरीला बोय्लो, “मे तुला हान्गीलता ना त्याला पायदॅ तॅ तॉ घारा येदॅ. .आतॅ बरोबर घारा आला ना”

**... ज्योएल गोन्सालवीस, मराडी, उमराळे**

## प्रतिक्रिया

संज्याव बावतीस ह्नाऑ दी, हकोबोटे दार उगडला तॅ दापुडॅ एक अंक पडल्यालॉ दिखलॉनाव हॉता कादोडी ., पयला वहरी, दुहुरॉ अंक .सूडळटी बयो, फादरसा शर्माव आयकॉन आयकॉन कंटाळलेल्यों आन खाला आठ हिंगोळयो, आहा शित्र हॉताई डॉखा कुना . हायदॅ? यावर विसार क बाजुला संपादक म्हणुन .या लागलॉस नाय-ख्रिस्तोफर रिबेलोआ नाव दिखला .बी शार जने मंडळातू होते . .अंक घॅतलॉ आन डेवनिओरतीस वाश्या बॅहॅलॉ

पॉरांदो, मॅ तुमश्योरती जाम खुश हाययात-उठॉन कॉप लोकलश्या गर्दीमिनॅ कुनॅ तरी .शी वायोरशी जागा दिली गा काहा - वाटातॅ, ताया आदी फरसू कुरे आन खंडु पिरे नावाशे दोन माहाने मॅ एका अंकात हाडलोते..., पान तॅ डॉकरॅ पॉटामिनॅस मॅलॅ बिशारॅ.

आपल्या कादोडी भाषेविषयी तुमाला जाका वाटातॅ ता जकलाश्याकसा शिमा लुद्रि .जकला तुमश्या लिखानातनॅ आलॅ- फेसबुकतॅ कुपा-याऑ पूल.. हांग्या हारका मस्तस आहातॅआपल्याला कादोडी .तॉ पान तुमश्या हरी हाय मींजॅ दुधात हाकर . जॉ मनापासून एखाद्या कामात उतरातॅ .यासा हाय ई संपादकियात लीविल्याली भावनास जाम बोठ्ठी हाय-भाषेकरता खूप कय क माला पान तॉतु .त्याला मदतिऑ तॉटॉ कत्तॅस पडॅ नायहॉस पडयासॉ नायतरी पान तूमे सगळे .आतॅ जगण्याऑ वेग वाडलॅ . वखत काडॉन बॅठात्या, आपली विजात सालल्याली भाषा उजेडात हाडॉन जगव्याशी ओडी धडपड करत्या, त्या करता जी काय खटपाट करत्या त्या गोष्टीला तोडुस नायकॉपिटर अन इंटरनेटला गाळी देनारी पान एक पीढी हाय ., पान आज त्यास कॉपिटर आणि नेटमुळॅ आपून सहज एकमॅकांना बेठु शकात्याव-, खूप कय करू शकात्याव ई अगदी खरा हायअन ऑ तुमसॉ कादोडी . या अंकामिनॅ लीवनारे सब्बन कादोडी लेखकांनॉ .अंक मींजॅ याऑ बॉठ्ठॉ पुरावॉ हाय, शाब्बास !

फादर स्टीफनसॉ हिस्सॉ पान वाखानन्या हारकॉस, जुन्या घरायों आठवणी काडनारी फ्लोरिटा अन आखेरीऑ संसार भरनारी तेरशी बाय या दोगी जनीनॅ ‘व्यंकटेश माडगुळकरश्या’ लीवन्याई आठवण करॉन दिली ऑ नेल्सन .डिमेलो कुन हाय ना तॉ मांगॅ पुडॅ शिरीष कणेकरसॉ वाडगे बनु शकातॅ. पॉरांदो अंक वासॉन जालॉ आन का वाटला ता हांगॉन जाला, आतॅ सूलीपुडनॅ कारबारनीई हाक आलॅ,आयकात्या“ , हींगोळी काही जालॅ ती जरा बगाना .”!

पॉरांदो मॅ पन्नास वहराऑ जालॉ .या पान्नास वहरात संजावसॉ हन ऑडया हॉश्यामिनॅ मॅ कत्तॅस साजरॉ कॅलॉ नाय . तुमश्या, माफ करा आपल्या या कादोडीआ दर्शनाएॅ मॅ जाम खूष जालॅ देव तुमा जकल्याआ .बरा कारो, आन पॉरापाराएॅ तुमसा घर भरो .

**--- बर्नर्ड लोपीस, आगाशी, हांबोडी.**

# एस्टर शिपिंग & लॉजिस्टिक्स इंडिया

टेलि. - ०२२ २६८२९८०८

फॅक्स – ०२२ २६८१७७७६

ईमेल – sales@eastershipping.com

robertadmello@yahoo.co.in

स्काईप – dmellor4

## वेलंकनी कोल्ड स्टोरेज अँड जनरल स्टोअर्स

### वाघोली फाटा, निर्मळ-सोपारा मार्ग,

आमशा अडे मस्त venkeys कंपनीए तयार

- चिकन नगेट्स, चिकन कबाब, चिकन कटलेटस, चिकन फिंगर्स, पॉपकॉर्न, मिट्बॉल्स, लॉलीपॉप, सॉसेजेस, सलामी मिळद्यात तहास पोर्क हॅम्स, पोर्क सलामी आन पोर्क सॉसेजेस ई पण मिळदॅं

गोदरेज रियल गुड कंपनीए तयार

- होल चिकन, चिकन प्री-कट, ब्रेस्ट बोनलेस, चिकन खिमा, मटन ई मिळदॅं

यास बरोबर Mecoin कंपनीए तयार

- फ्रेंच फ्राईस, स्माईल्स, तंदुरी वेज नगेट्स, वेज स्प्रिंग रोल्स, पोटॅटो ट्रंगल्स, वेज फिंगर्स, वेज कटलेट आन ग्रीन पीज ई मिळदॅं

हयाजबरोबर फ्रोजन वाटाणा, मशाले, सॉसेस, केचप्स, विलंग्री, जिंजरपेस्ट मिळद्यात.

खास – शुभकार्यासाठी फ्रेंच फ्राईस, सॉसेजेस आन सलामी अहया सगळ्या वस्तूंशी ऑर्डर रास्त भावात घेटल्यो जायद्यात.

प्रोप्रा – रॉक डाबरे

९९७०९४८९४४

# बाबुकाका आणि ती (एक धमाल विनोदी रहस्य कथा)

ती भयानक रात... (आणि बाबुकाका , अन्द्र्या , शिमा सगळ्याई जोरदार पार्टी) जाम पाणी पडातें, आन हांशा पाराय ७ जालें आन बाबुकाकाय पाय काप्या लागलें कारण टॉनिक घ्यासा टाइम जालता बार जॉरदार पाणी पडातें आन अङें बाबुकाका आंगाला कापरी हुटले. टॉनिक जें घॅटला नाय तें जीवाण पण जासा नाय. मंग बाबुकाकानें ठरविला कय पण होवोन्दे पण माला गॅलास पाय, पण जासा काहा ? कारण ऑड्या पाण्यात जर निन्गालों तें मरीकाकाय धाडणार नाय. बगून बाबुकाकानें विसार कॅलों कि दापुडणें जाण्यात अर्थ नाय तर मिन्गारणें गेला पाय. मंग मनाव पक्को निर्धार करॉन बाबुकाका हत्री घॅऑन मिन्गारणें निघालों. मिन्गारणें मिन्जें लोका भाटातनें.

वरण्ये जोरदार पाणी पडातें त्यात विज चम्कातें. जॉर जॉराय गडगडाट हॉतें, तरी पण बाबुकाका न घाबरता पुडें साललॉस. पुड्सा काय दिखें नाय. पूर्ण काळोख. या सगळ्योर लक्ष न देता बाबुकाका पुडें निघालें कारण त्या डॉळ्यासमोर फक्त पावशेर दिखातोती. बाबुकाका पुङें साललोतॉस गा त्याला कुणें मांगनें हाक दिल्याव आवाज आलों. बाबुकाकानें मांगें बगीला पण कून नाय. परत काळॉखात बाबुकाका निघालों. परत एकदम तॉहॉस आवाज. बाबुकाकानें मांगें बगीला तें कुनुस नाय. आतें बाबुकाकाई पूर्णपणें फाटली. विसार कॅलों कि मांगें जाव गा पुडें जाव. पण परत एकदा बाबुकाकाला डॉळ्यासमोर दारुई बाटली दिखली, तहॉं बाबुकाका तावातावात पुडें निन्गालों. पाण्याव जोर अजून वाड्लोतों. पूर्ण काळोख त्यात रातकिड्याव आवाज. बाबुकाका पटापट सलात निन्गालों. आणि त्यामीनें जा हव्या पा नॉता तास जाला. बाबुकाका पुडें जाता जाता एकदम थांबलों. कारण मांगनें कुनें तरी बाबुकाका पोण्याव कहाटॉ पकड्लॉतॉ. बाबुकाका लगेस थांबलों. पण मांगें बगॅशी थोडी पण हिम्मत बाबुकाकामिनें नोती. बाबुकाका बोय्लो पोन्या होड, पण कयुस आवाज नाय. फक्त हालचाल हॉतें अहो आवाज येतोतॉ. बाबुकाकाई हालत खूब खराब जालती. त्याला ऑड्या पडत्या पाण्यामिनें घाम आलतॉ. बाबुकाका जाग्योरूस उबॉ. कारण पुङें जासो इलाज नाय, पुङें गॅलों तें कहाटॉ त्या हातात हाय गणाय. पोन्या हुटॅदें. आतें करॅसा तरी का? कारण पोन्या हुटला आणि गावात गॅलों तें इज्जतिया खॉबरा होणार. बगून त्यानें माकून एकदा हंगिला पोन्या होड. तुला पोन्यास पायदे तें मा घारा नवा कॉरा करकरीत पोन्या हाय ता तुला देनें. पण इ होड. पण कयुस उत्तर नाय. मंग शेवटी हिम्मत करॉन बाबुकाका मांगें फिरलों. आन बगीतें तें का हाय, मांगें कुनुस नाय. एका झाडाई कुडी बाबुकाका बरोब्बर पोन्या कहाटाला अडकाल्ती. बाबुकाका मनात्षा मनात हावलों आन परत पुड्श्या मार्गाला लागलों.

त्या काळॉखामिनॅस बाबुकाका पुडें निगालों आन थोडॉ पुडें गॅलों नाय तव त्याला कुनें तरी हाक मारली. आतें बाबुकाकाई गाबोळी पूर्णपनें फाटली. तॉ थोडॉसॉ धावातूस निन्गालों. परत एकदा बाबुककला कुनें तरी हाक मारली. बाबू थांब में अन्द्र्या. अन्द्र्या नाव ऐकिता खोटी बाबुकाका जीवात जीव आलों. त्यानें मांगें वळॉन बगीला आन त्याला शॉकुस लागलों. बगीतें तें मांगनें अन्द्र्या आणि नानाकाका दोगी हातात मस्तपैकी गावठी बाठली आन साकना घॅऑन आल्यात. बाबुकाका खुश. मंग तिगाई तडे भाटात रहाट हॉतॉ त्योर बस्तान मांडीला. मंग बाठली काडली साकना काडला आन मस्त गप्पा-टप्पा करीत सललें. बाबुकाकानें २-३ कॉप मारले आन तॉ रंगात आलों. त्यानें अन्द्र्या नि नानाला हन्गिला कि आतें आपू नास करॅसो, आन त्याई नास कऱ्यादो सुरवात केली. नास करता करता बाबुकाका लक्ष या दॉगा पायोर गॅला आन मंग बाबुकाकानें जोडी पिल्ती तोडी सगळी उतर्ली. बगीतें तें दॉगाय पाय वाकडें हात. बाबुकाकाई परिस्थिती एकदम भयानक जाली. बाबुकाका पोन्या पुडनें ओला नि मांगनें पिवळा जाला.

तॉ जोराय पळात पळात निन्गालों. तॉ कडे साललों तॉ त्यालास माईत नाय. पाणी अजून सुरु हॉतॉ. धावात धावात पुडें येतें आन बगीतें तें पुडें जाम बोठ्ठो भोम्बडॉ लाग्लोतॉ आन त्या बाजूला एक बायकू नासातें. बाबुकाका तहॉं थॉडॉ सावट माह्यु. बायकू बगीली तहॉं तडे गॅलों आन जवळ जाऑन बगीतें तें का एकदम भारीस बायकू. का वर्णन करॅसा त्या बायकुआ. एकदम गोरी पान, आंगाला मजबूत. हिरवा नववारी लुगडा नॅह्लेली. तियें डॉळें तेरशी घतीन, कपाळ जानू घतीन, नाकुट बाजी घतीन, माथा फरशी घतीन, हात गराशी घतीन, कम्बार मीना घतीन. मांगनें ती लुजी घतीन दिखातें तें पुडणें शिजू घतीन. बाबुकाकाला थॉडा वेळ वाटला कि तॉ देवळात सॉड्यालीटी सभेला

# D'SOUZA COLLEGE (MIMPE)

Govt. Recognized / Affiliated to DTE, MSBTE, IGNOU, NIMS, PTU, CVRU, CMJ Universities

## ADMISSIONS OPEN

**10th, 12th, BA, B.COM, BCA, BBA, BPT, B.SC, B.TECH, MA, M.COM, MCA, MPT, M.TECH, MBA, MS.CIT, ENGINEERING DIPLOMAS, PH.D, HOTEL MANAGEMENT COURSES**



Reasonable Fees

Loan Facility Available

:0250-3248230/31

: 09321018960



Website: www.mimpe.org

Email Id: mimpe.org@gmail.com

आलें. बाबुकाका जाम खुशीत. त्याला वाटला कि त्या पुडें कुणें जाम्बाई बाठ्लीस ठोविले. या सगळ्यात बाबुकाका मांग्सा आख्खा बाहालों. मंग बाबुकाका ती दरी गॅलों. ती नास करतीस होती. बाबुकाका हळूस तिया मॅरें गॅलों आणि तिला विसारला कि तू कून ? ती एकदम लाजली आन  बोयली मा नाव मार्तीन. बाबुकाका बोय्लों नाव खूप मस्त हाय. पण ऑड्या रातशी ओडे बरे कपडे करॉन तू नाशा कदो लागल्या. ती हांगातें, "में  मा शिल्याई वाट बगीतें, येनें हान्गॉन तों अजून आलों नाय बग.  बाबुकाका बोय्लों, "मॅस शिल्या " ती बोय्ली,"तू शिल्या नायना तू पिल्या". बाबुकाकानें विसारला तुला कहा माईत? तें मार्तीन बोय्ली तू तोंडाला वास येतें. मार्तीननें बाबुकाकाला विसाराला, " तुम्शा दरी १ रुपासों कॉईन हाय गा. माला शिल्याला फोन करॅसो हाय. बाबुकाकाने १ रुपासों कॉईन काडलों आन  मार्तीन्षा हातोर ठविलों तें  तों  १ रुपय खालास पडलों. कारण मार्तीन्षा हाताव पन्जों बगॉन बाबुकाकाला चक्कर आली. तिया हाताला डॉळों हॉतों.

बाबुकाकाला जिगाळा शुद्धी आली तीगाळा बागीतॅतें तों पलांगोर निजलॅलों हॉतों, आन  आख्खा लोक बाबुकाका मॅरें उबी. ऑड्यात नानाकाकानें बाबुकाकाला हाक दिली, "बाबू कहा वाटातें" ऑड्यात बाबुकाका उठॉन उबी रॅलों नि हान्गातें "मा नाव शिल्या". मंग का हान्गॅसा बाबुकाकानें आख्ख्या गावाला धुमाकूळ घायलों. बाबुकाकानें पोन्या नॅहॅसा हॉडॉन पॉराई तोकडी टुमान घाल्या सुरवात केली. जॉर जॉराय गाणें बोलात आन  नास करीत आख्ख्या गावाला फिऱ्यासों. गाणों पण कुह्रों, "मा नेम इस शिल्या" शिल्या कि जवानी" आन  "मार्तीन बदनाम हुवी" शिल्या तेरे लिये...  अडे घरशे आणि बाबुकाकाय मित्र टेन्शन मीनें. कि यों अहों का करें लागलों. अन्द्र्यानें देवळोरसों फादर घारा प्राथना कऱ्या  हाडलों. फादर बाबुकाका मॅरें बेहॉन बोय्लों,"बाबू" बाबू बॉलता खोटी बाबुकाका रागावलों, " आरें मा नाव शिल्या हाय आणि माई मार्तीन तडे माई वाट बगीतें" फादर आपु का करों आपु आज रातशें मार्तीन्षा दरी जाव तू मा  जोडीला सल मिन्जें आम्सा तडे लगीनुस लावॉन दे. आन  तुला तडे एक बेस्मन लागेदें ना... लगीन लाव्या जासा हान्ग्ता खोटी फादरनें हळूस पाय काडलों आन  बेस्मन पण न्यासों हान्ग्ता खोटी अन्द्र्या गायब..  फादर मरीकाकाय्षा दरी गॅलों गा आन  तिला हांगातें  दादे  का करॅसा, का हवें देवालास माईत. त्योर मरीकाकय  बोय्ली "फादर मा  दुख तुमाला का हान्गों, या खड्ल्या बळें मादो मंगळसुत्र कतें लागला नाय गा आन  आतें पोराई कडे नवा कॅलें ता १ वहरीभर तरी घाल्या मिळदें गा नाय देव जाने.

अडे नानाकाका हॉपारशा  भगताला घॅवॉन आलों. भगतानें बाबुकाकाला एका खोलीत घायला आणि १ तासाभरान भगत सगळें मंत्र बॉलॉन निगॉन गॅलों. दुहऱ्या  दिहा हॉपारषा भगता घरशे ४-५ जन बाबुकाका घारा आले. अडे अन्द्र्या, नानाकाका जकले बाबुकाका घारास होते. नानाकाकाने त्या ४-५ जनांना विसारला कि का जालें मनून. ते हान्गात्यात कि यों बाबुकाका कून हाय ता  पायलों हांगा. नानाकाका बोय्लों पण जाले का ? तर त्या मिन्सों एक बोय्लों, "आरे या बाबुकाकानें आमशा भगतला का हान्गीला देव जानें"  तों आख्ख्या हॉपाऱ्यात हाफ पॅट घालॉन "मा नेम इस शिल्या.. शिल्या कि जवानी" गाणों बोलात नासात फिरातें. आतें त्याला बरा करॅदो बोळींजवरणें भगत हान्गीलें.  आतें सगळें जाम टेन्शन मीनें आले. आन  मंग सगळ्याई विसार कॅलों कि बाबुकाकाला जावून्दे मार्तीन्षा दरी, आपुन पण त्या मांगें जाव गा आपल्याला का हायता कळदें. त्या रात्सों अजीबात पाणी नॉतों. बगून बाबुकाका भाटात धावात धावात गॅलों. त्या मांगें अंद्र्या, शिमा आणि नानाकाका तीगे गॅलें. तडे जाऑन बगीतें तें का, एकदम बोठ्ठो भोम्बडों पॅटलें आन  मार्तीन तडे नासातें. बाबुकाका तिया जवळ गॅलों. ई ये तीगे एकदम लांब उबी रॅवॉन बगीतोतें.

मार्तीन्ने बाबुकाकाला बगीला आणि त्या आन्गोर २ बाल्ड्यो  पाणी टाकिलों. बाबुकाका पुरों भिजलों. अडे अंद्र्यानें तोंडोरणें हात फिर्विलों तें अंद्र्याव शॅहरों एकदम ऑलों, माथा ऑला, छातीवर हात हाडलों तें सदरा पण ऑला आन  पॅट पण..  अंद्र्या पुरों घाबारलों. में ऑड्या लांब हाय तरी में कहों भिज्लों. त्यात अंद्र्याला जॉर जॉरात कुणा तरी बायकुआ आडन्याव आवाज येतॉतों. अंद्र्यानें डॉळें उघडॉन बगीला तें अंद्र्या  बायकू हातात रिकामी बालदी घॅवॉन  उबी आणि ती अंद्र्याला हान्गातें कि हान्शापारशें ५ जालें आतें तरी उठा गणी. दॉपारा जरा कमी पेवती. आन्द्र्या तिला विसारतें ... पण बाबुकाका! आतें अंद्र्याई बायकू एकदम शिडली आणि रागात, " मावले सायबेने का करॉ ला.. ई खडला पयला निज्यादो पण मा नाव घ्यासा पण आतें ई फेसबुक वर I **Bet** आल्यापासून निज्यात जागो जागी बाबुकाका बाबुकाका करीत फिरातें... तही अंद्र्याला पूर्ण जग आली आणि अंद्र्या जॉर जॉराय हाव्या लागलों... कारण कडे काय नाय..  यों I  **Bet** शो रहस्य कथा आईकॉन, वासॉन  अंद्र्याला स्वप्न पडलोता...

**सचिन रॉड्रिग्ज, रांबाई**

**Think Travel Think NITIN…!!!**

**NI3's Travel Point**

**"The Morning Star"**

**चला वेलंकनीला**

ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी

## नवीन चर्च समारोह

## दिनांक ९ फेब्रु. ते १३ फेब्रु. २०१३

दोन्ही बाजूने (मुंबई – चेन्नई – मुंबई)

प्रौढांसाठी रु. १३०००/-, मुलांसाठी रु. १२०००/- (अटी लागू)

किंवा चेन्नईपर्यंतचा प्रवास आपला

(चेन्नई ते वेलंकनी पिक-अप ड्रॉप, जेवण एसी हॉटेल) फक्त रु. ५०००/- मात्र

वि. सू. : वेलंकनी नवीन चर्च समारोह १० फेब्रु. २०१३ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता संपन्न होणार आहे.

**नाशिक बाळ येशू दर्शन : १६ व  १७ फेब्रु २०१३**

प्रौढांसाठी रु. २०००/-, मुलांसाठी रु. १७००/-

(दोन ब्रेकफास्ट व तीन जेवणासाहित)

**अमृतसर – जम्मू – श्रीनगर – पहेलगाम - गुलमर्ग – सोनमर्ग – शिकारा**

ट्रीप १ – दिनांक २ ते १० मे २०१३

ट्रीप २ - दिनांक १२ ते २० मे २०१३

मुंबई अमृतसर ३एसी, अमृतसर एसी हॉटेल, अमृतसर-जम्मू एसी बस, श्रीनगर हाऊसबोट स्टे, जम्मू ते श्रीनगर विमानप्रवास, श्रीनगर ते मुंबई विमानप्रवासासहीत –

प्रौढांसाठी रु. २४,०००/-, मुलांसाठी रु. २२,०००/-


## संपर्क – नितिन लोपीस

ग्रेस पॅलेस, भाटी नानभाट,

मोबाईल – ०९७६२३५५०६०, ९२२४१५९७३२, ८००७८४६०१०, ०२५० – ६९२८४८७

**ईमेल – ni3.lopes@gmail.com**

# वरांगळो

भादवो पालो आन आश्विन उन्गावालो तही पासु काकाई निज उडली. शिताए निम्बरे जहे तडकाले तहे पासुकाका छातीत मुहाले घायले. अहेस निम्बरे जे पड्या लागले ते पन्दरा दिहात राटबायो सालू- होयदयात आन मंग मे होडझुप कही करने? राटाला दुहरा कुणाला जुफो? पिकाये दोनशारुस गाड़े हायदयात पान मा एका बयलाय पिक घराय काहा येदे? एकाला दुहरो बैल कडसो हाड़ो? आमदा ओल वायादो नान्गाराला दुहरो बैल क्याव पयरव् झुपोआ? या विसराय पासुकाका कडीला नुस्तो भोम्बडो लागलो

कालो बैल मारखांडो होतो खरो पान तहबाहा एकाला दुहारो गनायप .ान इख्रिशाने वेलुस तही हाडली ती एक पासुकाका ज्ये होडलो ते बी कुणाला ननदरया नोतो देखात पासुकाका पूडे जही मेली माहि पान बी कुणाला मेरे नोतो एओन दयासो.पयली पयली नुस्तो मुंडी हासक्यासो . अंगोर नोतो कते यासो. पान आते आते तेला का जालता कुना गायी. नुसता कुन मेरने गेला तरी टुकोन टाक्यासोकोडया लोकाना तेने मरला ..., त्याओ कय पत्तोस नाय.. लोकाये गरने तरी कोड़े आइक्यासे? त्या दिहा ते तेने पासूकाकाला आन इमा काकयला तोंड दावड्याशी जागा थोयली नाय. शिश्याखाल्श्या शेंदुओ पोर तडने जातोतो , त्या हातात कय हतरी होती त्या .. बिशारयाला ओ कोडलो कोहो हाय ता माईत नोतो . ओ त्याला बगोन का भुर्कालो गा का जाला ता त्या देवाला माईत .. तेने जोराई आम्हाक मारोन पाग तोडली , त्या पोरा मांग्या लागलो तेला हिंगोर टुकिला आन दिला टाकोन. नशीब पेंडया राहीऑर टाकिला. दगडा राहिओर टाकीलोसा ते पासुकाका आन इमा काकय ला तोंड काला करयाशी पाळी येओती. पोर कय लागला नायपान .. पोरा तोंडोर नुस्ती राखेडी पिकलीमेला घाबरला . गनाय .. बरा जाला नेमको पासुकाका भाटातने आल्तो नाय ते कय बरयाई पाळी नोती . तीगालास पासुकाकाने ठरविला . या काळतोंड्याला पाग लाव्याशी. दुहरयास दिहा तेने कवडी मोलात तेला होपारश्या कसाया गळी घायला आन एकदासो हूटटो पडलो.

तीगाला हूटटो पडलो खरो पान आते पासुकाकाला डोख्याला हात लाव्याशी पाळी आली. ओड्यादी भाद्व्याए कय कामे नोते तव भागला. पण आते? आते एकाला दुहरो कड्सो हाड्यासो? होपारश्या विंजारेला अजुन टाईम हाय . आन बय्लायो कीमती आय्कोन विन्जर्या जाशी बिशात कुनाई हाय ? गावकोठारी खुप सवकशी केली. एलातेला खुप हान्गिला पान कुनाओ बैल विक्याशी बातमी त्या कानोर आली नायआन . आहा करता करता भादवो खपोन आश्विन पालो.

राती पासुकाका आन त्याई कारभारिन इमाकुमारी (इमाकाकय मिन्गु बाबाई कुमारी भगुन आख्या गावाई कुमारीविसार करीत ( बेहेलतेखूब . विसार केलो पान गाठ कय केल्या हुटली नाय.कइस आरोथोरो दिखात नोतो . ओडयात इमाकुमारिया मनात कय आला. ती लोळयो वळता वळता जरा थांबली आन पासू कोपातला बोयली ”आय्कात्या मे का हान्गाते. आपल्या मिन्गुकोपात्शी जरा भेट घ्या नात्या सुद्धा ! एका बैलोरुस आले गनाय. त्या काब्रा एकुस आन आपलो पारो एक्लोस. धुर बरोबर जुळदे . जरा जाओन विसरोन ते बगाना. पासु काकाने हाथाय टिसकी वाजविली आन तों ताडकन उठलोतेने . डोख्योर हात मारलो आन मनात विसार केलो. ई मा डोख्यात कहा नाय आला? ई ओडा जवळसा होडोन माओ राट कड़े कड़े फिरात आलो. तो इमा काकयला बोयलो .“ हा ओ वरंगाळ

बरोबर जमेदे. हाकोटेस जाते. मिन्गु कोपात्शा पूडे ओ विसार मांडिते .मे निजाते .आते निशितायशी निज ." आहा बोलोन ते निज्या गेले . पासुकोपात निशित्यासो निज्यासो बोयलो खरो पान हप्पे रात तेला निज आली नाय . डोळ्याला डोलो लागलो नाय . हाकोबोट होते कते आन मिन्गुकोपात्श्या ओटयोर सड़ाते कते आहा जालता तेला. पातेरात्शी आयमेरी होयाश्या आदीस तों उठलो . एन्गातेंगा निखलोस वेळ घालविलो . जरा पैस पड्या लागला तहा ओटयोरसो कंदील वीजविलो. आन तों गोठ्यात गेलो . बैला आन भयश्या पुडे पेंडो टाकिलोआज तेने भय थोड़ी . .लवकरुस दुएली काल हानशी तिने मस्ती केलती. दोन वेळेई भरली होती भगुन थोड़ी लवकर दुयाशी होतीस. इमा काकयने हेना पान्या आटपिला. कोपभर शा केलो, एक पान्गो केलों त्यात्सो सउत कुडको पान्गो आन तों शा पासुकाकाने कोहोबोहो घाटीखाला लोटिलो आन तों मिन्गुकोपात्श्या घारा निन्गालो.

मिन्गुकोपात हाकोबोटे हाकोबोटे तोंड धोया लागलोतो. तेरु कुमारी हेन भरया लागलोती. ओडयात ती नन्दर गेली. पासुकोपात खान्धोर कबज्या टाकोन एताना तिने बगिला. तेने कुमारिला बगिला आन बोयलो "कुमारी का सलले ?" "आय तुमे आले गा ? कय नाय ना. दोनशार- खेपो पान्याओ हाडल्यो गा आन बाबु उठे तव बला हेना एकदा आटपोन टाकिते. नाते यो भई रांडो नुस्तो कालो करोन ठोयदयात. मग ता हेन अक्खा अंगोर होलाते " "तुमसा kaha सलले ? कुमारी काल बिदवारश्या देवला दिखली नाय ती ? बरे हात गनी? का विसार केल्तो ?" तोडयात तडने मिन्गुकोपातने हाक मारली, "कोपात आज शालास अड़े आले ते ? कुमारी हात्सो शा पे वाटातेया ! या. ई कड़े गेली बरा ? अय हा कड़े ला ?"

"कोपात, तुमे मालिया तयारीला लागल्या पान दुहरया बैला का केले ? पासुकाकाने मिन्गु कोपात्श्या जहनी घायोरती मीठा सोल्ला ." " कोपात बोलो नाका ना मा ! आंगाला नुसता हेव लागातेतुमाला . का हांगो. माओ होन्या हारको बैल ना हाडलेल !्या शार वहरे पान नोते जाले , तू नागराला घाल गा राटाला जुप. गाडा ते लान्या पोराने हाक्ल्यासा. पान पहाल्यात त्या पायाला कहा कूट आला का हांगो. मायो आख्या आवज्यो केल्यो. सगळ्या दाडी वाइलो तव पोत बेसखाससो ! आते खारसनिला बानदयासो ओडयात लंगड्या लागलो. तरी मे लागलीस काळ्याकाकाला दावडलो . ईमबलोरसो डाक्टरसुद्धा हाडलो. कुने हान्गिला डांब दया ते डांब सुद्धा दिलो . पान त्याये शारू पाय लाग्याशे रेले ते रेलेस . तो जो आडवो जालो तों परत कय उठलो नाय. माओ बैल गेलो आन माय पेखाले साप मोडल्ये . आते ओड्यादी त्यास विसरात हाय . आते मावली काय करदे आन इ गाठ हुटेदे ते ... नायते ........."

" इ गाठ होड्यादोस ते मे आलेतुम्शो . काब्रो आन माओ पारो एक्लोस . पान बोलात्यत ना ! एकलो तों अर्दो आन दोगे ते शोगे" आपुन वरंगालो करो. आन एकामेकाई नड काडो. माते घना हिपना मिळे नाय . आपुन आपले वारे तहे लावोन घेवो. लानी बानदनी थोड़ी पुडेमांगे घेव" पासुकोपाताने आहा हान्गता बरबर मिन्गुकोपातला शार पाय जाले." कोपात तुमे कहा म मनाहारका बोयले! तुमश्या तोंडात हाकर पड़ो. ठरला. आमदा आपलो वरंगालो ! "आइकिला हा कड़े ? कोपताला शा बी दे गा नाय ? कोपात बिया शा सा टाइम जाला नाय ..." आहा बोलोन तेने बिडिआ बंडल कोपात्श्या पुडे केला आन पोराला हाक मारली ,"बाबु सूलीपुडशी आग हाडू रे .....

फ्रान्सिस डिमेलो, दोनतलाव

# हार्दिक शुभेच्छा.





विजय मचाडो
अध्यक्ष SVS
९८२०४१६६६१

सचिन मेंडिस
जनरल सेक्रेटरी SVS
९६१९५५५४२०
sachin.mendes@gmail.com

समस्त कुपारी मंडळीला नाताळ आन नवीन वहरायो हार्दिक शुभेच्छा

**शुभेच्छूक:**

**विजय मचाडो**
**अध्यक्ष**

**सचिन मेंडीस,**
**जनरल सेक्रेटरी**

**स्वाभिमानी वसईकर संघटना आनी सगळी 'Team SVS'**

FLORIX SOFTWARE SOLUTIONS

WEB DESIGN AND DEVELOPMENT

DOMAIN NAMES AND WEB HOSTING

RICHARD - 90049 11199

VASAIFLOWERS.COM

ALL INDIA ONLINE FLORIST AND GIFTS

CADBURY SILK CHOCOLATES

FACEBOOK.COM/VASAIFLOWER

--------------------------------

KING BHUJING CORNER (KBC)

AGASHI BHUJING IN MUMBAI

* EKSAR ROAD

* IC COLONY

FACEBOOK.COM/BHUJING

SUDHIR - 90048 01234